# बाल-चरित्र

## मुलांमुलीकरितां

# बाल-चरित्रमालिका.

कलिका २ री.

ग्रं. सं. ठाणे
२२०

नामदार गोखले.



ए. पी. बापट अँड ब्रदर्स,
बुधवार पेठ, पुणें.

१९२३.

REFBK-0002481

किंमत ४ आणे

ॐ नमः

# बाल-चरित्रमालिका.

कलिका २ री.

वा
ज्या
लिहिणे

# ना० गोपाळ कृष्ण गोखले यांचें चरित्र.

संपादक

भाऊ श्रीधर कुलकर्णी.

प्रकाशक

ए. पी. बापट अँन्ड ब्रदर्स.

बुकसेलर्स

REFBK-0002481

[आवृत्ति] १९२४ [किंमत ४ आणे.

हें पुस्तक अनंत पांडुरंग बापट, मालक, ए. पी. बापट अँड ब्रदर्स
यांनीं प्रसिद्ध केलें.

व

रामचंद्र नारायण लाड यांनीं आपल्या " श्रीशिवाजी प्रिंटिंग प्रेस
पुणें, पेठ सदाशिव, घर नं. ५५६ मध्यें छापिलें.

# निवेदन

बालचरित्र मालिकेची ही दुसरी कालिका आम्ही आमच्या बाल-वाचकांस सादर करीत आहोंत. जाती, पंथ व पक्षभेद मनांत न आणितां ज्यांचे पासून सद्गुण मिळवितां येतील अशाच थोर पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याचें मालेचें ध्येय आहे. त्याप्रमाणें हें नामदार गोखल्यांचें चरित्र आमच्या बाल--वाचकांना सन्मार्गदर्शक होईल, अशी आमची खात्री आहे.

कै० नामदार गोखले हे मवाळ पक्षाचे होते, म्हणून त्यांचें अंगीं कांहीं सद्गुण नव्हते किंवा त्या सद्गुणांना किंमत नाहीं, अशा कल्पना करणें अत्यंत चुकीचें होणार आहे. इतकेंच नव्हें तर पक्षभेद मनांत न आणतां गोखल्यांचें चरित्र पाहिल्यास त्यांचे सद्गुण उच्च कोटी पैकीं होते ही गोष्ट कोणीही कबूल करील. लोकमान्य टिळक यांनीं-सुद्धां गोखल्यांच्या गुणांची तारीफ केलेली आहे. गोखले यांचे निधन-प्रसंगीं लोकमान्य टिळक यांनीं जें भाषण केलें होतें त्यांत, ‘ गोखल्या सारखा सद्गुणसंपन्न मनुष्य मिळणें महा दुर्लभ आहे.’ असें स्पष्ट म्हटलें होतें. लो० टिळक आणि ना० गोखले यांचेंमध्यें पक्षभेदामुळें अत्यंत चुरस होती. असें असतांना सुद्धां लो० टिळकांनीं ना० गोखल्यांचे गुणांची वाहवा केली ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हे. यावरून गोखल्यांचे सद्गुण उच्च कोटीपैकीं होते यांत कांहीं शंका नाहीं.

पुढारी होण्यास अंगीं बरेच सद्गुण असावें लागतात. आपला स्वार्थ सोडावा लागतो. आपल्या देहाची पर्वा करीत बसण्यास वेळ मिळत नाहीं. असाच मनुष्य पुढारी बनत असतो. ना० गोखले यांनीं कधींहि आपला स्वतःचा स्वार्थ साधला नाहीं. एखादी मोठी नोकरी सांभाळून

किंवा वकीली करून खूप पैसा मिळविला असता, परंतु तसें न करितां त्या. लोकसेवा करण्यांतच आपला जन्म घालविला. आपला देश, आपले लोक यांना देव मानून त्यांची सेवा जितकी करितां येईल तितकी केली आहे. या कामाकरितां त्यांनीं आपल्या शरीराकडे कधींही लक्ष दिलेलें नव्हतें. यामुळें त्यांना अकालींच मृत्यूचे जबड्यांत सांपडावें लागले. लोकसेवा करण्यांतच त्यांचा अंत झाला. यावरून गोखल्यांची थोरवी किती आहे, हें समजून येईल.

बाल मित्रांनो ! ना० गोखले हे मवाळ असले तरी त्यांचे गुण मवाळ नव्हते. हे ध्यानांत ठेऊन त्यांच्या गुणांचे अनुकरण करा. तुम्ही राष्ट्राचे भावी आधार स्तंभच अहांत. हिंदमातेचें भाग्य तुमच्या कर्तबगारीवरच अवलंबून आहे, ही जाणीव तुम्ही आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवा. सामान्य लोक जन्मास येतात, पोट भरतात व मरतात. अशांचीं चरित्रें कोण लिहिणार ? लिहिलीं तरी उपयोग काय ? असे लोक पुष्कळ सांपडतात.

**जे कां रंजले गांजले ।**
**त्यासि म्हणे जो आपूले ॥**
**तोचि साधू ओळखावा ।**
**देव तेथेंचि जाणावा ॥ १ ॥**

श्री तुकाराम महाराज ह्यांच्या या म्हणण्याप्रमाणें नामदार गोखले यांनीं संकटांत पडलेल्या दुष्काळग्रस्त अशा लोकांकरितां आपला देह झिजविला. तेव्हां त्यांना देवपण प्राप्त झालें. पण तुम्ही गोखले गोखले म्हणून भजन करूं नका. त्यांचे गुण घेण्यास झटा; तरच उपयोग होईल.

भूतदया, परोपकार, लोकसेवा, इत्यादि शब्द जरी दिसण्यांत सुंदर असले तरी ते आचारांत आणणे सोपें नाहीं. परोपकार करण्याची

संधी तुम्हाला अनेकवार लाभूं शकेल, तिचा कधीं फायदा घेतला आहे काय ? याचें उत्तर देतांना तुम्हांला घोटाळ्यांतच पडावें लागेल. सामान्य गोष्टीबद्दल इतकी उदासीनता असल्यास मोठालीं कामें कशीं होणार ? याचा विचार करा.

चणें खावें लोखंडाचे, तेव्हां ब्रह्मपदीं नाचे ।

हें तत्व लक्षांत ठेवून त्याप्रमाणें आचरण ठेवावे.

बाल सवंगड्यानो ! तुम्ही जरी लहान आहांत तरी पुढें मोठे होणार आहांत. तुमच्या कर्तबगारीवरच देशाचें भाग्य अवलंबून आहे. ही गोष्ट विसरूं नये. ' मी म्हणजे एक सामान्य मनुष्य आहे. माझे हातून काय होणार ? ' असा विचार मनांतसुद्धां आणूं नका. ' नर करणी करे तो नर का नारायण हो जायगा ' ही म्हण लक्षांत ठेवा. थोर पुरुष कांहीं उपजतच थोर होत नाहींत. ते सुद्धां लहानपणीं तुमच्या सारखेच असतात. सद्‌गुण संपादण्यावरच थोरपण अवलंबून असतें. म्हणून तुम्ही ही गोष्ट लक्षांत ठेवून सद्‌गुण संपादन करण्यास झटा.

मधमाशीचें उदाहरण नित्य लक्षांत ठेवा. प्रत्येक पुष्पांतला थोड-थोडा मध जमा करून त्याचा ती सांठा करीत असते. तुम्हीसुद्धां त्याचप्रमाणें करा. प्रत्येकापासून थोडा जरी सद्‌गुण तुम्ही घेत गेल्यास किती तरी सांठा होईल. ' थेंबे थेंबे तळें साचें ' या न्यायानें तुम्ही करीत गेल्यास तुमचे जवळ सद्‌गुणांचा सागर सहज सांठून जाईल. मग तुम्ही थोर पुरुष व्हाल. या जगांत गुणासच मुख्य स्थान देतात. ही गोष्ट लक्षांत ठेवा.

या चरित्रमालिकेच्या प्रत्येक पुस्तकांत आरंभीं चरित्र देऊन शेवटीं या चरित्रापासून तुम्हाला काय शिकतां येईल याचें थोडक्यांत वर्णन दिलेलें असतें तें तुम्ही नीट वाचीत चला. त्यावर शांतपणें थोडा विचरा

करा. ते सद्गुण आपल्या अंगीं कसें आणतां येतील याचा विचार करून ते गुण वाटेल ते करून मिळवा. हेंच तुमचें कर्तव्य आहे. याला वेगळा वेळ लागणार नाहीं, यानें अभ्यासाची खोटी होणार नाहीं. गुणामुळेंच मनुष्यास मनुष्यपणा येत असतो, तेव्हां गुणसंग्रह करण्यास मुळींच कसूर करूं नका.

त्याच त्याच गोष्टी वरचेवर सांगून तुम्हाला कंटाळा आणण्याचें काम मी आतां करीत नाहीं. मालेचें हें पुष्प इतक्या लवकर बाहेर आणण्याचेंही श्रेय आमचे स्नेही **श्री अनंतराव बापट** यांचे कडेसच आहे. त्यांनीं सर्व जबाबदारी हौसेनें आपल्या अंगावर घेतली असून ते ती तशाच हौसेनें पार पाडीत असलेले पाहून साहजिकच आनंद वाटतो अशाच उत्साहानें ही माला चालू राहील असें म्हणावयास हरकत नाहीं.

पहिल्या कालिकेंत जाहिर केल्याप्रमाणें पुढचीं पुस्तकें यथावकाश आम्ही आमच्या बालवाचकांस सादर करूं. इति.

आनंद-भुवन ऑफिस
पुणें शहर.
१२–१२–२३

संपादक.
**भाऊ श्रीधर कुलकर्णी.**

ॐ नमः

# बाल-चरित्र-मालिका.

## कलिका २ री.

# गोपाळ कृष्ण गोखले यांचें चरित्र.

## पाठ १ ला.

### दोन शब्द.

बाल मित्रांनो ! या चरित्रमालिकेच्या पहिली कळी तुम्हीं पाहिली आहेच. आतां ही दुसरी कळी तुमचे हातीं देत आहे. गांव म्हटला कीं तेथें सर्व प्रकारचे लोक येणारच. आपला हा हिंदुस्थान देश आहे. या देशांत नानाधर्मांचे, पंथाचे व मतांचे लोकांचा भरणा हा असणारच. आपण ही माळ गोंवित असतां एकाच जातीच्या पुष्पांची माळ गोंविणें बरें नाहीं. या मालेंत सर्व प्रकारचीं सुगंधी पुष्पें असलीं तरच उपयोग जास्त होईल. आपल्याला त्या पुष्पांच्या जातिविषयीं जास्त चौकशी करावयाची जरूरी नाहीं त्यापासून मिळेल तेवढा सुगंध घेणें हेंच आपलें कर्तव्य आहे. बाल वाचक ! तुम्हीं अशी दृष्टी ठेवा तरच तुम्हांला सद्गुणांचें भांडार जमवितां येईल. फूल कोणतें कां असेना त्यापासून

जेवढा सुगंध मिळवितां येईल तेवढा मिळविला पाहिजे. हेंच तुमचें कर्तव्य आहे.

इतके लिहिण्याचें कारण म्हणजे आपल्या या देशांत अनेक जाती आहेत. धर्म जरी एक असला तरी त्यांचें पोट भेद अनेक आहेत. तोच प्रकार इतरही ठिकाणीं आहे. राजकीय दृष्ट्या प्रयत्न करणाऱ्या मंडळींत आतांपर्यंत जहाल व मवाळ असे दोन भेद आहेत. हल्लीं यांतही आणखी भर पडत आहे. यापैकीं आपलें आजचे चरित्र नायक कै॰ वा॰ नामदार गोखले हे मवाळ पक्षाचे पुढारी होतें. सरकारशी सहकारिता करूनच स्वराज्य मिळविले पाहिजे. सनदशिर पद्धतीनेंच आपली चळवळ चालविली पाहिजे अशा मतानें हे मवाळ लोक आहेत. हल्लीं या पक्षानें 'प्रागतिक' पक्ष असें नांव घेतलें आहे. बाल सख्यांनो ! गोखले हे मवाळ होते, म्हणूनच नाक डोळे मुरडूं नयेत. तेवढ्यानें त्यांचें चरित्र वाचावयाचें नाहीं असे मनांत आणूं नये. गोखल्यांच्या चरित्रापासून कितीतरी बोध घेतां येईल, नवीन ज्ञान मिळवितां येईल. आपण तेवढेंच पाहूं या. त्यांची राजकीय मतें काय होती, सामाजिक धोरण काय होतें याचें आज आपल्याला कारण नाहीं. म्हणूनच आम्ही सर्व प्रकारच्या लोकांची चरित्रें तुमचे हातीं देणार आहे विद्यार्थीदशेंत मिळेल तेवढा ज्ञानसंग्रह करा व मग तरूणपणीं सर्व गोष्टींचा सारासार विचार करून कोणत्याही मताचे, पक्षाचे व्हा. त्याबद्दल तुमचेवर सक्ति करूं इच्छित नाहीं. फक्त सर्वमान्य अशा थोरांचीं चरित्रें तुम्हाला मार्गदर्शक होतील याच उद्देशानें तीं तुमचे हातीं देत आहोंत.

कित्येक विद्यार्थी गोखले श्रेष्ठ कीं, टिकळ श्रेष्ठ म्हणून वाद करितांना आढळतात. असा वाद किंवा तुलना करूं नये असें आमचें म्हणणें नाहीं, परंतु त्यापूर्वीं त्या दोन्ही व्यक्तींच्या चरित्रापासून आपल्याला काय

घेतां येईल हें प्रथम पाहिलें पाहिजे. ते ज्या सद्गुणावर पुढें आले ते सद्गुण आपल्या अंगीं उतरवून घेणें हेंच विद्यार्थ्यांचें कर्तव्यकर्म आहे. अशा तऱ्हेनें सद्गुण संपन्न होऊन, अवश्य ज्ञानाचा संग्रह करून मग तुम्ही वाटेल त्या पक्षाचे व्हा. पण तो काल फार पुढचा आहे. केवळ अंधश्रद्धेनें, अंगीं कांहीं पात्रता नसतां एखाद्यास तुच्छ लेखूं नये, ही गोष्ट पूर्णपणें लक्षांत ठेवा. किडा, मुंगी यापासून जर आपल्याला बोध घेतां येतो. तर इतक्या थोर व्यक्तीपासून किती बोध घेतां येईल याची कल्पनाच करावी.

नामदार गोखले यांची योग्यता मोठी होती. त्यांना आतांपर्यंत पूज्य मानणारे लोक अनेक आहेत. गोखल्यांचें नांव निघाल्याबरोबर एक प्रकारचा स्वाभिमान वाटतो. म्हणूनच आम्ही त्या थोर गृहस्थाचें चरित्र आमच्या बालवाचकांचें हातीं देत आहोंत. आम्ही त्या पक्षाचे नाहीं हें खरें परंतु आमचें हें मत कांहीं आमच्या बालवाचकांवर लादूं इच्छित नाहीं. फक्त थोर, अनुकरणीय गृहस्थांचीं चरित्रें देण्याचा आमचा मानस आहे. यात सर्व पंथाचे, दर्जाचे, धर्माचे लोक घेणार आहोंत. हें येथें मुद्दाम नमूद करून ठेवीत आहोंत.

बाल वाचक ! आतां आपण आपल्या चरित्राकडे वळूं या. विषयाचें महत्त्व पटविण्यास हे दोन शब्द पुरे आहेत असें आम्हांस वाटतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, नं....... ता. ठाणे.

# पाठ २ रा.

—:*:—

# बालपण.

गोपाळरावजींचा जन्म ता. ९ मे सन १८६६ रोजीं रत्नागिरी जिल्ह्यापैकीं चिपळूण तालुक्यांतील कोतळूक गांवीं झाला. यांचे वडील कृष्णराव गोखले हें कागल नामक एका संस्थानांत फौजदार होते. यामुळें गोपाळरावांना वयाचीं पहिलीं दहा वर्षें कागलासच काढावीं लागलीं. या मुदतींत त्यांचा मराठी अभ्यास तेथेंच झाला. यानंतर गोपाळराव व त्यांचे वडील बंधू गोविंदराव हे दोघे कोल्हापुरास शिकवावयास राहिले. दोघे बंधू इंग्लिशचा अभ्यास करीत होते. परंतु यांत एक मोठें विघ्न निर्माण झालें. संकटाशिवाय मनुष्याची परीक्षा होत नसतें म्हणून म्हणतात तेंच खरें ठरलें. आतांपर्यंत जे थोर लोक होऊन गेले त्यांना संकटांशीं झुंजावेंच लागलें आहे. किंवा ज्यामानानें जास्त संकटें येतील त्यांना नेटानें तोंड देणारा मनुष्यच मोठा ठरला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. गोपाळरावजीवर यावेळीं मोठें संकट आलें होतें त्यांचे वडील इसवी सन १८७९ सालीं वारले. घरची तर गरीबी, आतां प्रपंच कसा चालणार? हा प्रश्न त्यांचे पुढें येऊन पडला. अखेर गोविंदरावांना शिकणें सोडणें भाग पडलें. त्यांना मोठ्या वशिल्यानें त्याच कागल संस्थानांत कारकुनाची नोकरी मिळाली. पगार थोडा व प्रपंच मोठा, मेळ बसणें शक्य नाहीं. परंतु गोविंदराव हे सर्व कष्ट सहन करीत होते. घरच्या नडी गोपाळरावापुढें न मोडतां त्यांचें होईल तेवढें शिक्षण करावयाचे असा त्यांचा मानस होता अशा तऱ्हेनें वडील बंधुंनीं हाल सोसले ही गोष्ट गोपाळरावास माहित होती. आपल्याकरितां आपल्या बंधूस फार त्रास सोसावा लागला म्हणून

गोपाळराव त्यांना आपल्या वडिलासमान मानीत असत. बंधुप्रेम ही एक अपूर्व चीज आहे. ही बंधुप्रीति या भावाभावांत चांगलीच होती. ही गोष्ट आमच्या बालवाचकांनीं नीट लक्षांत ठेवावी.

इ सन १८८१ सालीं गोपाळरावजींची प्रवेशपरीक्षा पास झाली. त्यांचा अभ्यासक्रम फारच चांगला होता. बुद्धि तीक्ष्ण होती. या गोष्टी मुळीं सांगण्याची जरूरीच नाहीं. कारण याशिवाय 'मोठेपणा' मुळीं मिळणार नाहीं. म्हणून आम्ही बुद्धि व अभ्यासक्रम यांचा उल्लेख आतां-पर्यंत केला नाहीं. त्याचप्रमाणें लहानपणच्या गोष्टीसुद्धां वगळल्या आहेत. लहानपणच्या खेळांतच जर आपण दंग होऊन ठराविक पानें अडविली तर पुढचें अनुकरणिय गुण कसें दिसणार ? या गोष्टींना आम्ही याकरितां फांटा दिला आहे.

सन १८८२ सालीं गोपाळराव कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्यें अभ्यास करूं लागले. व त्याच सालच्या अखेरीस ते पी. ई. चे परीक्षेंत पास झालें. त्या वेळची एकंदर स्थिती मोठी मनोवेधक होती. कॉलेजमध्यें मोठ्या उत्साहानें काल जात असतो. हे दिवस आनंदाचे असल्यानें याची आठवण जन्मभर खास रहात असते. अनुभव घेतलेल्या लोकांसच ही कल्पना येऊं शकते. ते दिवसही तशाच कांहीं महत्वाचें होतें. त्या स्थिती-कडे तरुण मनुष्याचें मन सहजच ओढत असे. प. वा. विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला सात आठ वर्षे लोक जाग्रतीचे काम करीत होती. समाज सुधारणा, लोकसेवा करणारा एक पक्ष नुकताच निर्माण होत होता. कृष्णशास्त्री चिपळूणकर, रावबहादूर गोपाळ हरी देशमुख, रावसाहेब रानडे वगैरे मंडळीच्या उद्योगानें हें कार्य जास्त जोरानें सुरू झालें होतें. सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा त्रिरंगी सामन्याची जय्यत तयारी करून हा पक्ष निर्माण होत होता. कॉलेजमधील विद्यार्थी याचाच विचार करीत असत. धडाडीनें देशकार्य करूं इच्छिणारे विद्यार्थी बरेच दिसून येऊं लागले.

आतांपर्यंत म्हणजे इ. सन १८७२ पर्यंत देशसेवा हा विचार फारच थोड्या लोकांच्या डोक्यांत येत होता. हिंदुस्थानाची अधोगति फारच झपाट्यानें होत होती. बुडत्याचा पाय खोलांत असें म्हणतात याचें उदाहरण दिसून येऊं लागलें होतें. ही अधोगती जरी थांबावितां आली नाहीं तरी निदान यापेक्षां जास्त अधोगती होऊं नये अशी कळकळ सहजच तरुणांचे मनांत घोळूं लागली. हें काम कांहीं सोपें नाहीं. या कामास पहिला मुख्य गुण स्वार्थत्याग हा पाहिजे आहे. कोणताही स्वार्थ उपयोगी नाहीं. कळकळ पाहिजे असतें. सतत सारखें काम करावें लागतें. दिलदारपणा हवा असतो. इतके गुण अंगीं असतील तरच त्या मनुष्याचे हातून कांहीं तरी देशसेवा होईल, समाजसेवा घडेल.

कित्येक लोक आपल्या मुख्य उद्योगांतून फावल्या वेळांत याचा विचार करीत असतात. परंतु एवढ्यानें कार्य होत नाहीं. एवढ्यानें अधोगती थांबणें शक्य नाहीं. या कामाकरितां सर्व जन्म घालविणारे लोकच पाहिजेत अशी मंडळी त्यावेळीं निर्माण होण्याची वेळ होती. शिकून एखादी पदवी मिळाली कीं झाले काम त्या वेळीं सरकारी नोकरी तेव्हांच मिळत असे. सरकारी हुद्याची नोकरी म्हणजे लक्ष्मीची कृपाच होय. भरपूर पगार घ्यावा, व ऐषआरामांत दिवस काढावेत हाच त्या वेळेचा क्रम. एकदां कां सरकारी नोकरीच्या कचाट्यांत सांपडलें कीं, मग देशसेवा, समाजसेवा हें कांहीं होणें शक्य नाहीं. ज्यांना ही सेवा करावयाची आहे त्यांनीं मोकळेंच राहिलें पाहिजे. असें त्यावेळीं तरुणास वाटूं लागलें. ही एक प्रकारची लाटच उसळली होती. याचवेळीं पुणें शहरीं चिपळूणकर, नामजोशी व लो० टिळक यांच्या प्रयत्नांनीं न्यू इंग्लिशस्कूल नामक शाळा स्थापन झाली होती. आपल्या देशबांधवास ज्ञानामृत पाजून शहाणे करणें हेंच आपलें काम आहे असें त्यावेळीं सुशिक्षितांस वाटत होतें. सर्व सुखावर लाथ मारून केवळ देशसेवेकरितां हा त्रास सोसावयाचा होता. वरील

मंडळी हल्लीं आपल्यास प्रिय, पूज्य वाटत आहेत याचें कारण दुसरें तिसरें कांहीं नसून तें देशसेवेतच आहे. ‘ चणे खावे लोखंडाचें, तेव्हां ब्रह्मपदीं नाचे, ’ असें म्हणतात तें यालाच. मोठेपणा फुकाचा नसतो ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

लोकांना शिक्षण देण्याचीं जीं अनेक साधनें आहेत, त्यांत शाळा काढणें हें एक साधन आहे, परंतु तसेंच दुसरें साधन म्हणजे वर्तमानपत्रें होय. वर्तमानपत्रांनीं लोकजागृती चांगली होत असते. हा अनुभव नवीनच होता. कांहीं वर्तमानपत्रें यापूर्वीं निघालीं होतीं परंतु त्या पत्रांनीं व्हावें तसें काम होत नव्हतें. राजा व प्रजा हे दोन पक्ष नेहमींच विरुद्ध असावयाचे. राजाचें हित पाहिलें कीं प्रजा दुःखी व्हावयाची, व प्रजेला सुख मिळालें कीं राजाच्या सुखसोयीस चिमटा बसावयाचा. असा हा परस्पर संबंध असल्यानें प्रजेचीं गाऱ्हाणीं चव्हाट्यावर मांडणारे पुढारी सरकारी नोकरांचे डोळ्यांत सलत राहणार. हल्लीं हा प्रकार पुष्कळ म्हणजे फारच पुष्कळ कमी झाला आहे. परंतु त्यावेळीं हा फारच उग्र होता हें जाणून प्रजेचीं गाऱ्हाणीं चव्हाट्यावर मांडण्याकारितां या वरील मंडळींनीं मराठी भाषेंत ‘ केसरी ’ व इंग्लिशमध्यें ‘ मराठा ’ हीं दोन वर्तमानपत्रें काढलीं.

अशा तऱ्हेनीं प्रयत्न सुरू झाल्यानें लोकांत एक प्रकारचें नवीन वारें खेळूं लागलें. आपला देश म्हणजे काय ? स्वतंत्रता कशाला म्हणतात ? याची जाणीव लोकांना होऊं लागली. केसरी म्हणजे सिंह होय. या सिंहाच्या गर्जनेनें महाराष्ट्र खडबडून जागा झाला. राजकीय, सामाजिक बाबतींत अनेक सुधारणा होऊं लागल्या. इतक्यांत केसरी पत्रावर पहिलें गंडांतर आलें. बार्वेप्रकरण उपस्थित झालें. याकामीं खटला होऊन केसरीकारांस १०१ दिवसाची शिक्षा झाली. त्यावेळीं लो. टिळक व कै. वा. आगरकर हे दोघे संपादक असल्यानें दोघांनाही शिक्षा झाली होती. लोकांकरितां शिक्षा भोगण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. या

शिक्षेनें लोकांत एक प्रकारचें तेज उत्पन्न झालें. हें संकट केवळ त्या दोघांवर किंवा केसरीवर नसून सर्व महाराष्ट्रावर आहे असेंच लोकांना वाटूं लागलें. चोंहीकडून सहानुभूतीचे उद्गार ऐकूं येऊं लागले. त्या वेळीं पुणे व कोल्हापूर येथें एक प्रकारचें स्थानिक महात्म्य असल्यानें विशेष महत्व आलें होतें. वरील तिन्ही संस्था चालविण्याचें काम कोल्हापुरचे रा. वामनराव आपटे यांचेवर पडलें. यामुळें इ. स. १८८२-८३ सालीं कोल्हापूर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना हा एक विषय चर्चेचा होऊन बसला. या मंडळींत गोपाळराव गोखले हे मुख्य होतेच. या मंडळीच्या खर्चाकरितां फंड सुरू झाला होता. कोल्हापूरच्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांनीं एक नाटक या फंडाकरितां केलें. यावेळीं गोपाळराव यांनींसुद्धां त्या नाटकांत काम केलें होतें. याचवेळीं गोपाळरावाचे मनांत देशासंबंधीं विचार घोळूं लागले. ते विचार कायम होऊन त्यांतच सर्व जन्म घालविला. म्हणून त्यांच्या चरित्रांत या प्रसंगाचें महत्व विशेष दाखविलें आहे.

त्यावेळीं पक्षभेद नव्हते; मवाळ व जहाल हे एकत्र होते. प्रि. आगरकर व लो. टिळक या दोन्ही व्यक्ति एकत्र होत्या. त्या भीन्न झाल्या. तेव्हांच पक्षभेद झाला. दुफळी झाली. प्रत्येक पक्षानें आपली दिशा आंखून कामास सुरवात केली. यांतच गोपाळराव यांनीं एक पक्ष उचलिला. परंतु तो विषय वेगळा आहे.

## पाठ ३ रा.

—:*:—

# विद्याभ्यास !

चरित्रामध्यें इतर भानगडी कशाला ? असें कित्येकांना वाटण्याचा संभव आहे. परंतु बालवाचक ! या भानगडी न करून कसें चालणार ? आपल्या चरित्रनायकानें जर या भानगडी करूनच मोठेपणा मिळविला होता, तर त्या भानगडी सोडल्यास त्या चरित्रांत काय राहील? म्हणूनच या चरित्रात तात्पुरत्या गोष्टींचा उल्लेख करणें भाग आहे. देश-सेवा व ती सेवा करणारी मंडळी, त्यांचा पक्षभेद इत्यादि गोष्टी यांचा उल्लेख करणार आहोंत. परंतु त्याबरोबर एक गोष्ट येथें मुद्दाम नमूद करीत आहोंत ती ही कीं, पक्षभेदाचा वादविवाद तेव्हांपासून आतांपर्यंत सारखा चालत आलेला आहे. तो वाद सोडून देऊन आपल्याला फक्त ज्ञानसंग्रह करावयाचा आहे. त्याच दृष्टीनें आम्हीं प्रयत्न करीत आहोंत. गोखल्यांचें चरित्र लिहिलें म्हणजे आम्ही त्या पक्षाचे आहोंत किंवा आमचा वाचक वर्ग तसा बनेल असें समजणें चुकीचें होणार आहे. गोखल्यांचें अंगीं कांहीं अप्रतिम गुण होते ही गोष्ट सर्वमान्य झालीच आहे. आम्ही तेच गुण दाखविणार आहोंत.

इ. सन १८८३ सालापर्यंत कोल्हापूर कॉलेजमध्यें फर्स्ट बी. ए. चा वर्ग नव्हता. म्हणून गोपाळराव त्या सहामाहीस पुण्यास आले. पुण्यास डेक्कन कॉलेजमध्यें त्यांची ही सहामाही गेली. त्यानंतर हा वर्ग कोल्हा-पुरास सुरू झाल्यानें गोपाळराव तिकडे गेले. याचवर्षी गोपाळराव फर्स्ट बी. ए. झाले. बी. ए. करितां त्यावेळीं गणित हा ऐच्छिक विषय होता. गोपाळरावजींचा हा विषय आवडीचा होता. ते त्याकरितां मुंब-

ईच्या एल्‌फिस्टन कॉलेजांत जाऊन दाखल झाले. तेथें गणिताचे प्रोफेसर हॅार्थॉर्नथ्वेट हे होते. १८८४ सालीं गोपाळराव बी. ए. ची परिक्षा पास होऊन दुसऱ्या वर्गांत आले, याचवो त्यांचा व प्रो० कर्वे यांचा स्नेह जडला.

हुषार, उपजत तीक्ष्ण बुद्धिचे विद्यार्थी उच्च शिक्षण संपादन करून बाहेर पडले तर त्यांत विशेष नसतें. परंतु गोपाळरावांचें मात्र तसें मुळींच नव्हतें. सर्वसाधारण मुलांप्रमाणेंच त्यांची बुद्धि होती. निदान ते विद्यार्थी होते तोंपर्यंत तरी लोकांचा समज तसाच होता, सर्वसाधारण लोकांस मोठेपणा कसा मिळवावा याचें उदाहरण म्हणजे गोखल्यांचें चरित्र होय, गोपाळरावांची बुद्धि तीक्ष्ण नव्हती, पण त्यांनीं दीर्घोद्योग मात्र सोडला नाहीं. आपल्या सर्वसाधारण मेंदूस स्वस्थ झोंपून आळसी बनूं दिलें नाहीं. पाठशक्तिही जबर होती. कित्येक विषय ते अगदीं तोंडपाठ करीत असत. याकामीं त्यांना काय त्रास पडला असेल याची कल्पना सर्वांना आहेच, याच गुणाचे जोरावर गोपाळराव हे वयाचे अठराव्या वर्षी बी. ए. झाले. प्रिय वाचक बंधूनों ! ही गोष्ट नीट लक्षांत ठेवा. गोखल्यांच्या मोठेपणाचें बीज वरील तीन गुणांतच आहे.

गोपाळराव कोठेंही असले तरी त्यांना घरच्या स्थितीचा कधीं विसर पडत नसे. घराकडून फी करितां मागितलेले पैसे नाटक सिनेमा, हॉटेल वगैरेकरितां खर्ची घालणाऱ्या वाचकांनो ! गोखल्यांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवावें. आपल्या घरची गरिबी आहे ही गोष्ट ते कधीं विसरून मोहास बळी पडले नाहींत. तारुण्याचा जोर, शहरांत राहणें. कोणाचा दाब नसणें इतक्या सोई असल्यावर विद्यार्थी सहजच मोहास बळी पडतो. जो या मोहास आंवरतो तोच पुढें सांवरतो. गोपाळराव नेहमीं या मोहापासून सावध असत, म्हणूनच त्यांचें चरित्र आदर्शवत पुढें येत आहे.

बी. ए झाल्यावर पुढें काय करावें हा प्रश्न मोठ्या महत्वाचा असतो. आपलें सर्व आयुष्य कोणत्या कामीं घालवावयाचें हें त्यावरून कळणार असतें. परंतु गोपाळरावांचें सर्व परस्वाधीन होतें. खर्चाची सोय होईल त्या मानानें शिक्षण होणार होतें. त्यांनीं कांहीं दिवस एल्. सी. ई चा अभ्यास केला. सिव्हिल सर्व्हिसकरितां विलायतेस जावें असें त्यांच्या मनांत आले होते. कांहीं स्नेह्यांनीं तशी खटपटही केली, परंतु पैशाचा गोष्टी जमून येणें केवळ अशक्य असतें, कारण श्रीसमर्थ म्हणतात—

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥

अशीच स्थिती गोपाळरवांची झाली. पैशाची सोय न झाल्यानें त्यांना आपली गोष्ट मनांतच ठेवावी लागली. इंजिनियरिंगचा अभ्यासही त्यांना सोडावा लागला. एल्. एल्. बीं. चा अभ्यास करावा असें त्यांनीं ठर-विलें, तशी सोय त्याच वेळीं पुण्यास झाली. न्यु इंग्लिश स्कूलमध्यें दरमहा ३५ रुपयांची नोकरी धरून अभ्यास सुरू केला. १८८५ च्या अखेरीस त्यांनीं पहिली टर्म्स भरली. पुढें मुंबईस ते अभ्यास करूं लागले, गोपाळरावांनीं त्याचवेळीं पब्लिक सर्व्हिस एक्झॅमिनेशनचा वर्ग काढला. त्यावेळीं त्यांना देशपांडे नांवाचे एक जोडीदार मि ाले होते.

१८८५ सालापासून न्यू इंग्लिश स्कूलची चढती कमान होती. आगरकर, टिळक, नामजोशी, केळकर, धारप, गोळे इत्यादि मंडळी श्रम करून संस्था भरभराटीस आणण्याचा प्रयत्न करीत होते. या मंडळींनीं कॉलेज काढण्याचा बेतसुद्धां मुक्रर केला. या संस्थेस डेक्कन एज्युकेशन सोसायटी असें नांव देवून संस्थेचें नियम वगैरे सर्व तयार केलें. कोणतीही संस्था चालविण्यास मनुष्यबळ व द्रव्यबळ या दोहोंची अत्यंत जरूरी असतें. उत्साही, स्वार्थत्यागी, सतत श्रम करणारी माणसें मिळणें कठीण पडतें. केवळ पगारागरितां काम करणारे नोकर हवे तेवढे मिळूं शकतील परंतु खऱ्या कळकळीचीं माणसें कशी मिळणार ? या संस्थेस हीच नड प्रथम

पडली. अशी माणसें मिळविण्याकरितां चालक मंडळी खटपट करूं लागली. गोपाळरावाचा या संस्थेशीं थोडाबहुत संबंध आला होता. त्यावेळीं आगरकर व टिळक हे दोघे पुढारी होते. या दोघाबद्दलही गोपाळरावांचे मनांत पूज्य बुद्धि दिसून येत होती. या मंडळीच्या संगतींत राहिल्यानें गोपाळरावांचा उत्कर्ष होऊं लागला. गोपाळरावांनीं यावेळीं इंग्लिश भाषेचा अभ्यास फार केला. गोखल्यांचा मुख्य गुण म्हटला म्हणजे एकदां एखादा विषय हातीं घेतला म्हणजे त्याचा अगदीं पाठपुरावा करावयाचा. इंग्लिश भाषेवर प्रभुत्व पाहिजे असें त्यांना वाटल्याबरोबर त्यांनीं अनेक ग्रंथ सूक्ष्मपणें पाहिले. कांहींचा अभ्यास केला. पॅराडाइज लास्ट, ग्लॅडस्टनचीं भाषणें, जॉन ब्राइडचीं भाषणें, बर्कचे ग्रंथ इत्यादि पुस्तकें, त्यांना अगदीं तोंडपाठ करून टाकिलीं. हा अभ्यास त्यांना पुढें फार उपयोगी पडला. कारण पुढें कित्येक व्यवहार त्यांना केवळ इंग्लिश भाषेमध्येंच करावें लागत असत. हा त्यांचा अभ्यास अगदीं जन्मभर चालला होता एखादी सुंदर कविता, लेख असला कीं तो नीट लक्षांत ठेवण्यास गोपाळराराव चुकत नसत.

अशा तऱ्हेनें इंग्लिश भाषेवर प्रभुत्व मिळविल्यावर गोखले हे मराठा वर्तमानपत्रांत मधून मधून लेख लिहित असत. ते लेख लोकप्रिय झाले होते असें म्हणतात. गोखले यांनीं १८८७ सालांत इंग्रजी अंकगणित लिहून तयार केलें तें पुस्तक त्यांनीं तज्ञ अशा लोकांस दाखवून छापून काढिले. या नवीन प्रयत्नानें त्यांची वाहवा झाली. पुढें हें पुस्तक मॅक-मिलन आणि कंपनीनें घेऊन तें प्रसिद्ध केले. ही एक पैशाची मदत त्यांचे प्रपंचास उपयोगी पडली. याचसालीं गोपाळरावजी फर्ग्युसन कॉलेज-मध्यें इंग्रजी अध्यापक म्हणून शिकऊं लागले,

फर्ग्युसन कॉलेजची त्यावेळीं बाल्यावस्था होती. हें कॉलेज स्थापन होऊन नुकतीं तीन वर्षें झालीं होतीं. दिवसेंदिवस त्याची चढती कळा

होतीं. त्या कॉलेजमध्यें गोखले व केळकर हे दोघे इंग्रजींचे प्रोफेसर होते. या दोघांच्या शिकवणीमध्यें फरक होता. या भेदामुळें कांहीं विद्यार्थी केळकरांचे व कांहीं गोखल्यांचे अनुयायी झाले होते. जो तो विद्यार्थी आपापल्या गुरूचें नांव मोठ्या अभिमानानें सांगत असे.

इ. सन १८९० हें साल महाराष्ट्रांत फारच महत्वाचें होतें. या सालची आठवण प्रत्येकांस असणें अगदीं जरूर आहे. याच सालीं पक्षभेदास सुरवात झाली. टिळक व आगरकर हे दोन पक्ष वेगवेगळे झाले. हा मतभेद झाला तो कायमचाच. राजकीय व सामाजिक आणि धार्मिक या तिन्ही प्रकारांत पक्षभेद स्पष्टपणें दिसून येऊं लागला. आगरकर व टिळक यांचें पटेना, अखेर टिळकांनीं १८९० सालीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा आपला संबंध सोडला. यामुळें गोखल्यांना गणित हा विषय शिकवावयास घ्यावा लागला. हें काम त्यांनीं १८९१ पर्यंत केलें.

पुढें प्रो० कर्वे हे कॉलेजमध्यें शिकऊं लागले. गणित विषय त्यांचेकडे दिल्यावर गोखले इंग्लंडचा इतिहास व अर्थशास्त्र शिकऊं लागले. या वेळची त्यांचीं व्याख्यानें फारच सुंदर होतीं. इंग्लंडचा इतिहास शिकवित असतां राजसत्ता, प्रजासत्ता यांतील मुख्य भेद सांगावे लागत असत. राजसत्ता कशी लहरी असतें यांचे विवेचन करावें लागत असे. याकरितां इंग्लंडनें काय काय प्रयत्न केले याचाही इतिहास विद्यार्थ्यांस समजावून सांगावा लागत असे. इंग्लंडचा इतिहास शिकवीत असतां गोखले हे त्याची हिंदुस्थानाशीं तुलना करीत असत, यामुळें हा विषय विद्यार्थ्यांस सोपा जात असे. अर्थशास्त्र शिकवीत असतां हिंदुस्थानची स्थिति घ्यावी लागत असे. जमीन महसूल, त्याची प्राप्ती, कर, व्यापार वगैरे विषय घेऊन त्याचा परिणामही सांगावा लागत असे. यामुळें या विषयाची सर्व माहिती जमा करणेंच जरूर होतें. अर्थशास्त्रावरील यांची व्याख्यानें फार सरस वठत असत. याचें कारण त्यांनीं या विषयावर चांगला अभ्यास केला होता, व ते नीट समजावूनही सांगत असत.

# पाठ ४ था.

—:*:—

# इतर शिक्षण !

पक्षभेदाचें मुळ लहानच असतें. हें बीज एकदां रुजलें म्हणजे पुढें मग त्याचा भला मोठा वृक्ष बनत असतो. हा सृष्टी नियमच व्यवहारांतही लागूं पडतो. गेल्या २५।३० वर्षांत महाराष्ट्रांत जे दोन पक्ष झाले होते त्याचें बीज याचवेळीं रुजलें गेलें. लो० टिळक व प्रि० आगरकर या दोन प्रमुख पुढाऱ्यामध्यें प्रथम कांहीं तत्वाबद्दल मतभेद झाला. याचें कारण अगदीं थोडक्यांत आहे. प्रथम राजकीय सुधारणा झाली पाहिजे असें टिळकपक्षाचें म्हणणें होतें. आगरकर पक्षास हें कबूल नव्हतें. प्रथम सामाजिक सुधारणा करूंया व मग राजकीय सुधारणेकडे वळूं असें त्यांचे म्हणणें होतें. राजकीय व सामाजिक सुधारणा झाल्या पाहिजेत ही गोष्ट दोन्ही पक्षास मान्य होत्या. फक्त प्रथम कोणती बाब हातीं घ्यावयाची याचा वाद होता. हा वाद केवळ तात्विक असतां तर इतकें रण माजलें नसतें, परंतु तसें घडलें नाहीं.

प्रथम मतभेद व नंतर पक्ष या पायऱ्याच आहेत याप्रमाणें घडूनही आलें. टिळक व आगरकर यांचे पक्ष बनले. टिळक पक्षानें राजकीय सुधारणेचा विषय हातीं घेतला व आगरकर पक्षानें सामाजिक बाबतींत भयंकर खळबळ उडवून सोडिली. प्रामाणिक तत्वाबद्दल मतभेद न राहतां पुढें त्याला द्वेषाचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें, यामुळें आगरकरांना केसरीचा संबंध सोडावा लागला. त्यांनीं १८८८ च्या दसऱ्यास ‘ सुधारक ’ म्हणून एक वर्तमानपत्र काढिलें. आर्यविजय छापखान्यांतून सोमवारीं सुधारक निघत असे व आर्यभूषण छापखान्यांतून मंगळवारी केसरी निघत

असे. या दोन्ही पत्रांत अगदीं खडाजंगी वाद माजला होता. याचवेळीं संमती वयाचें बील पुढें आलें होतें. यावेळीं दोन्हीं पक्षांनीं आपापलीं मतें जनतेपुढें मांडिली. या बीलाविरुद्ध केसरीनें टीका करावी व सुधारकानें ती बाजू लढवावी असा क्रम सुरू होता. सुधारक पत्र निघाल्यापासून त्याच्या इंग्रजी भागाचें संपादकत्व गोपाळराव गोखले यांचेकडे होते.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्यें टिळक व आगरकर हे प्रमुख होते त्याचवेळीं गोखले तेथें होतें. आगरकर यांचा स्वभाव निष्कपटी होता. उदात्त विचार, साधी रहाणी, स्वार्थत्याग इत्यादि अपूर्व गुण त्यांचे ठिकाणीं होतें. हे गुण गोखल्यांना आवडल्यामुळें ते आगरकरांचे शिष्य बनले. अखेरपर्यंत ते त्या पक्षांत राहिले. टिळकांचे अंगीं हे गुण नव्हते असे मात्र नाहीं. गोखल्यांचा कल इकडे वळला. त्यावेळच्या तरूण मंडळींत गोखले हेच तरतरींत व हूषार होते यामुळें हेच कांहीं तरी करतील असें आगरकरांना वाटत असे. तेंच अखेर खरें ठरलें, आगरकरांचे पश्चात् गोपाळराव गोखले हेच त्या पक्षाचे पुढारी झाले.

पक्षभेद झाला कीं आपापला पक्ष जोरदार करण्याकरितां प्रयत्न हा करावाच लागतो. यावेळीं पक्षाभिमान हा केव्हांही होणारच. त्यांत दुसऱ्या पक्षाची नालस्ती, निंदा, व्यक्तिविषयक टीका यांचा समावेश होतच असतो. ही टीका सहन करण्याची आगरकरांची तयारी होती. ते टीका सहन करून उत्तरेंही देत असत. परंतु गोपाळरावांची तशी स्थिती नव्हती, विद्यार्थी दशा संपवून ते नुकतेच कोठें डोकें वर काढण्याचा प्रयत्न करित होते. यामुळें त्यांना ती टीका फार झोंबत असे. कोणत्याही पक्षास कांहीं सर्व सारखेच लोक असतात असें नाहीं. विरुद्ध पक्षाबद्दल असावा तितका आदर सर्वांचें ठिकाणीं नसतो. यामुळें विरुद्धपक्षास नांवें ठेवण्याचें खटपटींत अत्यंत ग्राम्य असे प्रयत्न झालेले आढळून येत असतात. हल्लीं-सुद्धां तोच प्रकार दिसून येत आहे. आतां मवाळ व जहाल यांचेंमधील

वादविवाद बंद पडला असें नाहीं, तो सारखा सुरू असणारच. परंतु हा तात्विक वाद सुरू असतां व्यक्तिविषयक टिका, निंदा यांचा भडिमार करणें व तोही वर्तमान पत्रांतून हें लक्षण चांगलें असें कोणासही वाटणार नाहीं.

नुकताच पक्षभेद होऊन आपापला पक्ष सबळ करण्याकरितां मंडळीच्या खटपटी सुरू असल्यानें विरुद्धपक्षाचा मोड करण्याचा मोह दोघांनांही वाटत असे. हा पक्षाभिमान केवळ कर्त्या पुढारी मंडळींतच होता असे मात्र नसे. असा प्रकार असतां तर हा वाद फारसा विकोपास गेला नसतां. परंतु एखादा सामान्य मनुष्यसुद्धां आपली योग्यता न ओळखून विरुद्ध पक्षावर हवें तें तोंडसुख घेण्यास कमी करित नाहीं याचा अनुभव सर्वांस आला आहेच. ही टीका गोपाळरावांस फार झोंबत असे परंतु यापासून बोध मात्र घेतला. तरी अखेरपर्यंत त्यांचें मन कोंवळें असल्याचेंच दिसून येत होतें. गोखले हे मनाचे कोंवळे असल्याचेच दिसून येतें. टक्केटोणपे खाल्याशिवाय मोठेपणा यावयाचा नाहीं, ही गोष्ट मुख्यतः त्यांना फार नडली.

१८९१ सालापासून सोसायटीचें सर्व काम गोपाळरावजीवरच पडलें. पत्रव्यवहार करणें, वर्गणी गोळा करणें वगैरे कामें फार महत्वाचीं होतीं. ९२ सालीं फर्ग्युसन कॉलेजच्या पायाचा दगड बसविला. यानंतर गोपाळरावावर जास्तच जबाबदारी पडली, कॉलेजच्या खर्चाकरितां पैसे गोळा करण्याचें काम होतें. याकरितां त्यांना फार हिंडावें लागले. केवळ तीन वर्षांचे अवधीमध्यें त्यांनीं इमारती करितां पैसे जमविले, ती इमारत कशी काय झाली आहे हें प्रत्यक्ष दिसतेच आहे. अनेक संस्था काढणें सोपें आहे परंतु त्यापैकीं एखादी संस्था सुरळित चालविणें फार कठीण आहे. अशा सार्वजनिक संस्था फार जबाबदारीच्या असतात. लोकांकडून पैसे

आणावयाचे तर त्यांचा खर्च योग्यकामीं झाला पाहिजे. लोकांना जमाखर्च दाखवावा लागतो.

सार्वजनिक कामें करण्याची हौस प्रत्येकास थोडीबहुत असतेच. तरूणपणीं याची छटा बरीच दिसून येतें. प्रपंचांत पडल्यावर मग मात्र या उड्या रहात नाहींत. हीं सार्वजनिक कामें कशीं करावीं याचें शिक्षण घ्यावें लागतें. मोठमोठीं कामें जरी खेडेंगावीं होण्यासारखीं नसलीं तरी सामान्य कामें होण्यास कांहीं हरकत नाहीं. रात्रीच्या शाळा, वाचनालय, वगैरे गोष्टी सहजच होण्यासारख्या असतात. या कामीं द्रव्य खर्च कांहीं फारसा लागत नसतो. लोकसेवा करीत असतां मात्र एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, मीच काय तो पुढारी आहे, तेव्हां लोकांनीं माझें ऐकलेंच पाहिजे ही भावना सोडून दिली पाहिजे. आपण केवळ लोकसेवक आहोंत ही गोष्ट कधीं विसरूं नये. आपण पुढारी नसून जनतेचे सेवक आहोंत ही भावना आपल्या मनावर बिंबवून घेतली पाहिजे. मोठेपणाचें बीज लहानांत असतें. ज्यांना मोठेपण पाहिजे असेल त्यांनीं आरंभीं लहानपणा घेऊन लोकांचें बिनपगारी नोकर बनलें पाहिजे. बालसख्यानो! तुम्हाला मोठें व्हावें असें वाटतें काय ? मग हें नीट लक्षांत ठेवा!

१८८७ सालीं महादेव गोविंद रानडे व गोखले यांची माहिती झाली. त्यावेळीं रानडे म्हणजे एक सुप्रसिद्ध पुढारी होते. पुण्यास 'सार्वजनिक सभा' नामक एक संस्था रानडे यांनीं स्थापन केली आहे. यांना न्यायमूर्ती रानडे असें नांव देतात. यानीं देशसेवा फारच चांगल्या तऱ्हेनें बजाविली असून त्यांचे चरित्र मार्गदर्शक होणारें आहे तेही लवकरच आम्हीं आमच्या वाचकांस सादर करूं. सार्वजनिक सभेस त्यावेळीं फारच मान मिळत होता. सरकारदरबारीं व लोकांतही तिचा मान होता. गोखले हे रानड्यांचे शिष्य बनले. रानडे यांची मतें फार उदात्त, विचार फार खोल असे असत. राजकारणामध्यें ते कोणास हार जाणारे नाहींत अशी त्यावेळीं

त्यांची ख्याति होती. अशा थोर गृहस्थाचा सहवास गोखल्यांना लागला. यामुळें त्यांचा फार फायदा झाला. १८८८ सालीं सार्वजनिक सभेचें गोखले हे दुय्यम सेक्रेटरी झाले. १८९० सालीं याच संस्थेतर्फे निघत असलेल्या त्रैमासिकाचे ते संपादक बनले. हा मान त्यावेळीं कांहीं सामान्य नव्हता. गोखले दिवसेंदिवस पुढें येऊं लागले. गोखल्यांच्या आयुष्यांत रानड्यांच्या सहवासांतील १५ वर्षे फार महत्वाचीं आहेत. गोखल्यांनीं सर्व शिक्षण रानड्यांपासून घेतलें असें म्हणावयास कांही मुळीं हरकत नाहीं.

इसवी सन १८९० पर्यंत गोखल्यांनीं शिक्षणच संपादन केलें असें म्हणावयास हरकत नाहीं. केवळ शाळेंतील चार पुस्तकें वाचिलीं म्हणजे अभ्यास झाला अशी कोणी कल्पना करून घेऊं नये. गोखले हे बी. ए., एल्. एल्. बी., होऊन कॉलेजमध्यें नोकरी करीत होते. तरी ते सार्वजनिक कामांत विद्यार्थीच होते. म्हणून आम्हीं या प्रकरणास इतर शिक्षण असें नांव देतों आतां आपण त्यांच्या सार्वजनिक कामाकडे वळूं या.

---

## पाठ ५ वा.

# जहाल व मवाळ !

पुढारी होणें ही गोष्ट चटकन बोलतां येते तशी चटकन होत मात्र नाहीं. स्वार्थत्याग करावा लागतो, हाडें झिजवावीं लागतात. पुढाऱ्यावर सर्व प्रकारची जबाबदारी असते. लोकांत अनेक प्रकारचे लोक असतात. त्यांचा विश्वास संपादन करावा लागतो. पुढारी होणें, लोकांनीं पुढारी मानणें ही गोष्ट कांहीं सोपी नव्हे. थोडे कोठें अविश्वास उत्पन्न झाला की

लगेच त्याचे पुढारीपण निघून जाते. लोक त्याला मानीत नाहींत. सार्वजनिक पैशाचा व सार्वजनिक कामाचा हिशोब नीट ठेवावा लागतो, हिशोब वरचेवर प्रसिद्ध करावा लागतो. याशिवाय पुढारी होणारास दुसरे अनेक गुण असावे लागतात.

महाराष्ट्रांत दोन पक्ष तर त्यावेळीं बनलेच. पूर्वीची एकी कांहीं शिल्लक राहिली नाहीं. एकजुटीनीं जी कामगिरी झाली असती ती होणें शक्य राहिलें नाहीं. ही गोष्ट लहान मुलगा सुद्धां सांगू शकेल. दुफळी होण्यास कोण कारणीभूत झाले, कोणी कोणावर टीका केली हें आपल्याला पाहण्याचें कारण नाहीं. फक्त आपल्याला पहावयाचें म्हणजे हे दोन पक्ष कसे निर्माण झाले व त्यांत चरित्र नायकानें काय कामगिरी केली एवढेंच आपल्याला पहावयाचें आहे. बालमित्रांनो ! हीं भांडणं थोरांमोठ्यांचीं आहेत. ती आपण पहावयाची आहेत, त्यापासून बोध घ्यावयाचा आहे एवढी कामगिरी आपली आहे. तेवढें काम आपण करूं या म्हणजे झालें.

बाल वाचकांनो ! हे दोन पक्ष झाले ते अद्यापपर्यंत कायम आहेत व बहुतेक पुढेंही कांहीं कालपर्यंत ते तसेच कायम राहतील असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. या दोन्ही पक्षाची साधारण माहिती तुम्हाला असणें जरूर आहे. म्हणून येथें त्याची थोडी माहिती देऊं.

प्रथम आपण आगरकरपक्ष घेऊं या. या पक्षास गोखलेपक्ष किंवा मवाळ, प्रागतिक अशी नांवें आहेत. प्रथम सामाजिक, धार्मिक सुधारणा करून मग राजकीय बाजूकडे वळावयाचें असें या पक्षाचें मत आहे. जातीभेद नसावा. अस्पृश्यता नसावी, जुनी धार्मिक बंधनें नको असें या पक्षाचें मत असल्यानें याला 'सुधारक' असेंही नांव मिळालेलें आहे. राजकीय चळवळ सनदशीर मार्गांनीं करून आस्ते आस्ते स्वराज्य मिळवावयाचें असा त्यांचा बेत आहे. स्वराज्य चालविण्यास आपले लोक

मात्र झाले पाहिजेत असें या पक्षास वाटत असते. या पक्षांत बहूतेक बैंडेवडे लोक आहेत.

दुसरा टिळकपक्ष होय. हल्लीं या पक्षांतहीं बरेच पोटभेद झाले आहेत तरी पण या पक्षास जहालपक्ष असें नांव आहे. हल्लीं हें नांव राहिलें नसून ' कॉंग्रेस पक्ष ' ' राष्ट्रीय पक्ष ' ' स्वराज्यपक्ष ' अशीं नांवें आहेत. या पक्षास स्वराज्य तात्काळ पाहिजे आहे. हिंदी लोक स्वराज्यास लायख झाले आहेत तेव्हां हरप्रयत्नांनीं पण शांततेच्या मार्गांनीं स्वराज्य मिळविणें हें या पक्षाचें ध्येय आहे. सामाजिक बाबतीमध्यें या पक्षास पूर्वीचीं सर्व बंधनें कबूल आहेत. चालू असलेला धर्म, समाज असाच चालावा अशी या पक्षाची समजूत आहे. या पक्षास धर्माभिमानी पक्ष असेंही नांव देतात. या पक्षास बहूतेक सर्व सामान्य लोकांचा पाठिंबा आहे.

हा पक्षभेद फक्त आपल्या महाराष्ट्रांतच आहे असें नाहीं. सर्व हिंदुस्थानभर हा माजला आहे. दोन्ही पक्ष आपल्याला लोकांचा पाठींबा आहे व आपला पक्ष मोठा आहे असें म्हणत असतात. दोन्हीचीही संख्या नियामित नाहीं व ती तशी लवकर होणारही पण नाहीं. दोन्ही पक्षास स्वराज्य पाहिजे आहे. एकाला धर्म कबूल नाहीं. सर्वत्र समान–सारखेपणा–असावा असें वाटत असतें. जहालपक्ष धर्मास चिकटून राहणारा आहे. जुनीं धार्मिक चाली एकदम मोडण्यास तो पक्ष तयार होत नाहीं. मवाळपक्ष धडाडीनें सुधारणा करीत असतो. पुनर्विवाह, स्त्री शिक्षण, अस्पृश्यता, जाती मोडणें हीं कामें त्या पक्षानें करून दाखविलीं आहेत. याचप्रमाणें जहालपक्षानें राजकीय बाबीमध्यें लोकांची बाजू सरकारास न भीतां बाहेर मांडली. यामुळें त्या लोकांना शिक्षा भोगून कष्ट, त्रास सहन करावा लागला आहे. बाल मित्रांनो ! तुम्हाला ही

२८७९

एवढी माहिती तूर्त पुरें आहे. तुम्ही विद्याभ्यास संपादून जेव्हां या भानगडींत पडाल तेव्हां याची जास्त माहिती होईलच.

बाल सवंगड्यांनो ! आतां आपण आमच्या चरित्राकडे वळूं या. सन १८८८ सालापासून गोखले हे सार्वजनिक कामांत पुढाकार घेऊं लागले. राष्ट्रीय सभा व प्रांतिक सभा यांचेमध्यें ते भारदस्त भाषणं करूं लागले. यांचे वजन पडूं लागल्यानें त्यांना मुंबई इलाख्यांतील पहिल्या प्रांतिक सभेचे यांना सेक्रेटरी नेमले. यानंतर सुमारें ४ वर्षेपर्यंत ते सेक्रेटरी होते. १८९५ सालीं पुण्यास राष्ट्रीय सभा भरली होती तिचे सेक्रेटरी गोखले हेच होते. राष्ट्रीय सभेची योग्यता येथूनच सारखी वाढत गेली. १८९७ सालीं वेल्बी कमिशनपुढें साक्ष देण्यास त्यांची निवडणूक झाली. हिंदुस्थानचे वतीनें त्यांची साक्ष फार महत्वाची झाली आहे. या साक्षीनें गोखल्याचें महत्व जास्त वाढलें. आतांपर्यंत ते फक्त एका प्रांताचे पुढारी होते परंतु पुढें ते हिंदुस्थानांत पुढारी बनले.

गोखले इंग्लंडांत असतां पुण्यास प्लेगचा भयंकर कहर उसळला. त्यावेळीं लोकांवर सरकारी नोकरांनीं, विशेषतः सोल्जरांनीं फारच अत्याचार केला असा गवगवा चोहोंकडे झाला. ही बातमी पत्रानें गोखल्यांना इंग्लंडांत पोंचली. तेव्हां तेथल्या कांहीं मंडळीच्या विचारांनीं त्यांनीं तेथें ती प्रसिद्ध केली. त्याबरोबर इंग्लंडमध्यें फारच खळबळ उडाली. सरकारी नोकर बेफिकीर वागतात म्हणून ठपका येऊं लागला. मुंबई सरकारनीं लेखी जबाब मागितला त्यावर कोणी धजेना. गोखले परत आले तेव्हां त्यांना मुंबई सरकारांनीं तुम्ही ही खोटी बातमी प्रसिद्ध केली म्हणून सांगितले. गोखल्यांनीं समक्ष चौकशी केली. परंतु समक्ष साक्ष देण्यास कोणी तयार होईना. गोखल्यांना मोठी पंचाइत पडली. अखेर त्यांनीं केलेली टीका परत घेतली व माफी मागितली. यामुळें लोकांनीं त्यांना नांवें ठेविली. सरकारची माफी मागणें हें नामर्दाचें काम

आहे असें म्हणून त्यांच्यावर टीकेचा भडीमार होऊं लागला. आपलें म्हणणें खरें करून दाखवितां येत नाहीं तर माफी मागण्यास काय हरकत आहे ? असें गोखल्यांना वाटत असे. या प्रकाराचा व टीकेचा त्यांचेवर फार परिणाम झाला होता. या प्रकारावरून गोखल्यांचा सरळपणा दिसून येतो. जी गोष्ट चुकली ती चुकली असें म्हणावयास हरकत नाहीं असें त्यांना वाटत असे. त्याचप्रमाणें त्यांना इंग्लंडांत जीं पत्रें पाठविली होतीं त्यांनीं बाहेर काढिली नाहींत कीं त्यांतलें एक नांवसुद्धां कळविलें नाही. यावरून त्यांचे मनाचा मोठेपणा दिसून येतो.

प्रागतिक उर्फ मवाळपक्ष आगरकर यांनीं स्थापन केला खरा परंतु त्याची सर्व जबाबदारी गोखल्यावरच पडली. आगरकरांचे पश्चात या पक्षाचे पुढारीपण गोखले यांचेवर येऊन पडलें. ही जबाबदारी सामान्य नव्हती. गोखल्यांनीं ही कामगिरी करून दाखविली आहे म्हणून त्यांचें चरित्र अनुकरणीय झालें आहे. बाळांनो ! यावरून तुम्ही त्या पक्षाचे व्हावें. असें मात्र आम्ही म्हणणार नाहीं. गोखल्यांचे गुण आपल्या अंगीं उतरवून घ्यावेत. एवढ्याच इच्छेनें हें चरित्र तुमचें हातीं देत आहोंत, या अंतरं स्थितींत तुम्ही मिळेल तें ज्ञान मिळवा व मग पुढें वाटेल त्या पक्षाचे व्हा, आतां आपण गोखल्यांच्या कामगिरीकडे वळूं या.

... ग्रंथ संग्रहालय
...... नं. ......
ता. ... ..
ठाणे.

## पाठ ६ वा.

—:*:—

# कामगिरी !

बाल सख्यांनो ! प्लेगामध्यें कशी स्थिति होते याची तुम्हाला जाणीव नसेल. या दिवसांत गोरगरीब लोकांचें अतोनात हाल होत असतात. वेळेवर पाणीसुद्धां मिळत नाहीं. मग अन्न व औषधपाणी याची गोष्ट लांबच राहिली. पुण्यांतील प्लेगानें गोखल्यांचे मनावर परिणाम झाला. प्लेग टोंचून घेण्याची पद्धत त्यावेळीं नवीन होती. परंतु लोकांना त्याची माहिती नसल्यानें या पद्धती बद्दल लोकांचा फार गैरसमज झाला होता यावेळीं गोपाळराव गोखले यांनीं फार चांगली मेहनत घेऊन परोपकार केला. या टोंचून घेण्याचे पद्धती बद्दल फार गवगवा झाला. म्हणून सरकारांनीं याची चौकशी करण्याकरितां सन १९०० सालीं एक कमिशन नेमिलें. या कमिशनमध्यें गोखले हे एक सभासद होते. यावेळीं गोखल्यांनीं चांगली कामगिरी केली. १९०५ सालीं गोखले हे पुणें म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष झाले. त्यांची काम करण्याची हातोटी पाहूनच लोकांनीं त्यांना अध्यक्ष निवडले होते. म्युनिसिपालिटी ही संस्था सार्वजनिक असते. तिचें काम करीत असतां जबाबदारीही असते. गोखल्यांनीं कडक शिस्तीनें ही कामगिरी चांगली बजाविली आहे. कमेटीनें काय काम केलें याचा अहवाल छापून तो प्रसिद्ध करण्याची पद्धत गोखल्यांनींच सुरू केली.

सर्व मुंबई इलाख्याचें मुख्य विश्वविद्यालय नामक एक संस्था आहे. या संस्थेंत १८९५ सालीं फेलोच्या जागीं गोखल्यांची निवड

झाली. ते अगदीं मेपर्यंत या संस्थेंत फेलो होते. एका वर्षी ते सिंडी-केटचे सभासदही होते. युनिव्हर्सिटीच्या व्यवस्थेंत ते फार लक्ष घालीत असत. राष्ट्रोन्नति होण्यास शिक्षण हेंच एक कारण आहे, असें ते म्हणत असत. ही गोष्ट सर्वमान्य झालेली आहे. लॉर्ड सिडनहॅम क्लार्क यांनी या युनिव्हर्सिटीच्या अभ्यासांतून इतिहास हा विषय वगळावयाचें ठरविलें. तेव्हां गोखले यांनीं या कामीं विरोध केला. शिक्षणाचे कामांत सरकारानें ढवळाढवळ करूं नये. असें स्पष्ट त्यावेळीं बोलून दाखविलें. इतिहास व अर्थशास्त्र हे दोन विषय त्यांचे आवडीचे होते. इतिहास, अर्थशास्त्र, व इंग्रजी या विषयाचे ते परिक्षक होते. बी. ए. व एम्. ए. या दोन्ही परीक्षांचे अभ्यासक्रम जे हल्लीं सुरू आहेत, त्यांत इतिहास हा विषय गोखले यांनींच घालावयास लाविला. बी. ए. ला राजनीतिशास्त्र घातलें. लॉर्ड कर्झन या गव्हर्नरांनीं विश्वविद्यालयाचा स्वतंत्रपणा हिरावून घेण्या-करितां कायदेकौन्सिल पुढें बील आलें. त्यावेळीं गोखले हे कौन्सिल-मध्यें होते. त्यांनीं त्या बिलाच्या अगदीं चिंधड्या उडविल्या. पुन्हा ही चुकी सुधारण्याचें बील आलें त्यावेळीं सुद्धां गोखल्यांनीं फारच चांगली कामगिरी केली आहे. शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां त्यांचा सर्व जन्म गेला. स्त्री असो पुरुष असो सर्वांना लिहितां वाचतां आलें पाहिजे तरच आपला देश भरभराटीस येईल म्हणून ते खटपट करीत होते. त्यांनीं सक्तीच्या मोफत शिक्षणाचें बील कौन्सिलपुढें आणिलें होतें परंतु त्यावेळीं त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. मात्र सक्ती केल्याशिवाय शिक्षण होणार नाहीं, असें सर्वांस वाटूं लागलें. या योगानें लोक मात्र जागे झाले.

आतां आपण त्यांच्या कौन्सिलच्या कामाकडे वळूं या. १८९९ सालीं त्यांची मध्यभागातर्फे मुंबई प्रांतिक कौन्सिलांत निवड झाली. दोन वर्षे ते त्या कौन्सिलमध्यें होते. त्यावेळीं म्युनिसिपालिटी संबंधानें एक बील

कौन्सिल पुढें आलें होतें. त्या बिलावर वादविवाद करितेवेळीं गोखले यांनीं फारच टीका केली. दुसरें बील लँड रेव्हिन्यु कोडाच्या दुरुस्तीचें होतें; हें बील चटकन पास करून घ्यावें असा सरकारचा मानस होता; परंतु हें बील प्रजेच्या दृष्टीनें फारच त्रासदायक आहे असा गवगवा झाला होता. त्यावेळीं सर फेरोजशहा मेथा हेही कौन्सिलांत होते. मेथांनीं हें बील तूर्त मागें ठेवावें असें सुचविलें, परंतु तें न ऐकतां सरकारांनीं तें बील पुढें मांडलें तेव्हां मेथा हे कौन्सिल मधून उठून बाहेर पडले व गोखल्यांनीं आपली नापसंती दाखवून त्यांचाच मार्ग स्वीकारला. यव-रून त्यांचा स्वाभिमान व करारीपणा दिसून आला. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नोकरीची मुदत १९०२ सालापर्यंत होती. ती पुरी करून ते मोकळे झाले.

न्या० रानडे १९०१ सालीं वारले. गोखले यांना गुरु मानीत होते. रानड्यांचें कांहीं तरी कायमचें स्मारक करावें, अशी त्यांना सहज इच्छा झाली. त्यांनीं पैशाकरितां चोंहीकडे हिंडून एक लक्ष रुपये जमविले. स्मारक कसें करावें याबद्दल एक कमेटी नेमिली. शास्त्रीय शोधाकरितां एखादी संस्था काढावी असें ठरलें. याबाबतींत सरकारशीं पत्रव्यवहार करून तिकडूनही मदत मिळविली. अशा तऱ्हेनें १९१० सालीं रानडे इंडस्ट्रियल व एकॉनामिक इन्स्टिटयूट ही संस्था सुरू झाली. या संस्थेचे गोखले हेच सेक्रेटरी होते.

१९०२ सालीं नामदार मेथा यांनीं वरिष्ठ कौन्सिलचा राजिनामा दिला, त्याच जागीं गोखल्यांची नेमणूक झाली. प्रांतिक कौन्सिलें ही प्रांतापुरतीं असतात. यांत मुख्य प्रांताचे गव्हर्नर असतात. वरील कौन्सिलेंही देशाचा व्यवहार पाहणारीं असतात व व्हाइसरॉय हे मुख्य असतात. गोखले हे १९०२ सालीं जे वरील कौन्सिलचे सभासद झाले ते जन्मभर होते. त्यावेळीं लॉर्ड कर्झन हे व्हायसरॉय होते. हे साहेब

अगदीं सुप्रसिद्ध आहेत. यावेळीं गोखले कौन्सिलमध्यें होते. ही गोष्ट महत्वाची आहे. गोखल्यांची छाप व्हायसरॉयावरसुद्धां पडली होती. म्हणून व्हायसरॉयांनीं त्यांना सी. आय्. ई. हा किताब दिला. गोखल्यांचा गौरव झाला. हा किताब त्यांना १९०४ मध्यें मिळाला.

१९०५ सालीं गोखले यांनीं सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी स्थापन केली. कॉलेजमधील शिक्षण संपविल्यानंतर देशकार्य कसें करावें याचें सशास्त्र शिक्षण देण्याकरितां या सोसायटीचा जन्म झाला आहे.

लॉर्ड कर्झनाचे दडपशाहीमुळें लोक फार खवळले. एका बंगाल प्रांतांचे दोन तुकडे केले. यामुळें लोकांना फारच चीड आली. सरकारी नोकर आपल्याला न विचारता आपल्यावर वाटेल तसा ताबा गाजवितात, वाटेल तसें गाजतात असें लोकाना वाटू लागलें. तेव्हां हा ताबा आपल्याला मिळावा असें वाटणें साहजिक होतें. यासंबंधानें कांहीं प्रयत्न करावेत म्हणून १९०५ सालीं गोखले हे इंग्लंडास गेले. गोखले हे दोन महिने इंग्लंडात होते या मुदतीमध्यें त्यांनीं हिंदुस्थानच्या लोकांची गाऱ्हाणीं, आपल्याला कशाची जरूरी आहे हें त्यांनीं जाहीर तऱ्हेनें तेथील लोकापुढें मांडिलीं. यामुळें भयंकर खळबळ माजून राहिली होती. यावेळीं लाला लजपतरायही इंग्लंडांतच होते. तेथून गोखले परत आले. लोकांनीं त्यांचा जाहीर सन्मान केला.

हिंदुस्थानांतील सर्व प्रांताचे पुढारी लोक एके ठिकाणीं जमून देशाचा विचार करितात व काय केलें असतां देशाची उन्नती कशी होईल याचा विचार करून अमूक करावें असा ठराव करितात, याला सभा असे म्हणतात. येथें राष्ट्राचा विचार करावयाचा असल्यानें त्या सभेला 'राष्ट्रीय सभा' किंवा 'कांग्रेस' असें म्हणतात. या सभेला अध्यक्ष लोकांनीं निवडावयाचा असतो. याचसालीं तो अध्यक्षता मान गोखले यांना

मिळाला. या अध्यक्षपदावरून लॉर्ड कर्झन यांच्या कृतिवर टीका केली आहे. त्यांचें तें भाषण मोठें पाहण्यासारखें आहे.

इसवी सन १९०६ सालापासून लॉर्ड मोर्ले हे व्हॉइसरॉय होऊन त्यांचें हातीं सर्व सत्ता आली. बंगालची फाळणी लोकांना फारच जाणवत होती. लोक चळवळ सुरूं करूं लागले, तसें सरकार दडपशाही करूं लागले. याच वेळीं इंग्लंडमध्यें लिबरलपक्ष अधिकारारूढ झाला होता. त्यावेळीं गोखले पुन्हा इंग्लंडास गेले. यावेळीं जाहीर भाषणें न करितां त्यांनीं सर्व मंत्री मंडळाच्या भेटी घेतल्या. हिंदुस्थानाविषयीं सर्व माहिती लोकांस करून दिली व कौन्सिलमध्यें कशा सुधारणा कराव्या हें सांगितलें यावेळीं फुल्लरसाहेबांनीं फार अरेरावी करून दडपशाही केली होती. गोखले यांनीं तीही गोष्ट तेथील लोकांस सांगितली यामुळें या साहेबांना तत्काळ येथून आपल्या देशी जावें लागलें. गोखले तिकडून परत आले. हिंदुस्थानांतील लोक आतांपर्यंत सनदशीर चळवळ करीत होते. अर्ज पाठविले, विनंत्या झाल्या, सभेंत ठराव पास केले तरी कांहीं दाद लागत नाहीं असें पाहून अखेर लोक निराश झाले. सरकार दडपशाही करूं लागले. यामुळें लोक जास्तच चिडले. यामुळें पुढाऱ्यावर एकप्रकारचें संकटच येऊन पडलें. लोक बेफाम होऊन अत्याचार करूं लागले. सरकार दडपशाही करूं लागलें. नेमस्त ( मवाळ ) पुढारी दोघांनाही उपदेश करूं लागले. परंतु त्यावेळीं कांहींच उपयोग झाला नाहीं, १९०७ साल म्हणजे स्वदेशी बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण यांची प्रचंड मोहिम सुरू होती. याचवेळीं गोपाळराव गोखले यांनीं देशांत चोंहींकडे फिरून फिरून लोकांना शांत करण्याकरितां व्याख्यानें देणें भाग पडलें. यावेळीं लोकांनीं गोखल्यांचा फार मान ठेविला होता. हत्तीवरून त्यांच्या मिरवणूकी काढल्या.

दडपशाहीनें लोक फार खवळले. यामुळें पूर्वीचा मतभेद जास्तच झाला. आतांपर्यंत हे दोन्ही पक्ष केवळ लांब लांबच राहून एकमेकांवर

टीका करित असत परंतु सुरत येथें तो प्रकार राहिला नाहीं. सुरतेस राष्ट्रीय सभा असतां हा वाद विकोपास जाऊन दोन्ही पक्षाची मारामारी झाली. यामुळें सर्व देशाचे इभ्रतीस कमीपणा आला. ही गोष्ट दोन्ही पक्षास मागाहून कळली. याचवेळीं मोर्लेसाहेबांनीं एक चौकशी कमिशन नेमिले होते. त्या कमिशन पुढें गोखले यांनीं फारच चांगली साक्ष दिली आहे. याकरितां त्यांना पुन्हां इंग्लंडास जावें लागलें. सुधारणा कशी असावी हे त्यांनीं मोर्लेसाहेबांस सांगितलें. १९०९ सालीं त्यांना अमेरिकेंत व्याख्यान देण्याकरितां बोलावणें आलें. परंतु याचवेळीं सुधारणासंबंधीं इकडे कायदे होणार असल्यानें त्यांना तेथून परदेशीं जातां येईना.

१९०९ साल म्हणजे भयंकर धामधुमीचें झालें. बांबगोळ्याचे कट उघडकीस आलें. अनेक गुप्त मंडळ्या स्थापन झाल्याचें आढळून आलें. यावेळीं गोपाळराव गोखले यांनीं सरकारास फार मदत केली. योग्यवेळीं सरकारास मदत करणें व प्रसंगीं त्यांचें वर्तनावर टीका करावयाचें हें नेमस्त पक्षाचें धोरणच आहे. या पक्षाचा सरकारावर विश्वास आहे. १९११ सालीं प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याचें बील कौन्सिलपुढें आणिलें. १९१२ सालापर्यंत यावर वादविवाद होऊन तें बील सरकारनें नामंजूर केलें.

आफ्रिका खंडांत आपले हिंदी लोक वसाहत करून राहिले व कांहीं वरचेवर नोकर म्हणून गेलेले आहेत. तेथील युरोपियन लोक हिंदु लोकांचा अपमान करितात, यामुळें आफ्रिकेंत राहणें धोक्याचें झालें होतें. हा प्रश्न फार महत्वाचा बनला गेला आहे. अद्यापपर्यंत हा लढाच सुरू आहे. यासंबंधानें आतांपर्यंत पुष्कळ उपाय झाले आहेत. याबद्दल कांहीं खटपट करावी म्हणून गोपाळराव इंग्लंडास गेले. तेथून प्रत्यक्ष आफ्रिकेंत जाण्याचें त्यांनीं ठरविलें. इतर हिंदुप्रमाणें त्यांचाही अपमान होईल असें कित्येकांना वाटल्यावरून त्यांनीं तशी सूचना देऊन ठेविली. गोखल्यांचा योग्य सन्मान

ठेवावा म्हणून हिंदुस्थान सरकारकडून लिहून गेले होते. साउथ आफ्रिकेंत गोखल्यांचा अपूर्व सन्मान झाला. असा मान परक्या देशांत कोणालाही मिळाला नाहीं, असें म्हणतात.

## पाठ ७ वा.

# शेवट !

आफ्रिकेंतील भांडण अगदीं निकरास आलें होतें. देशभक्त-हल्लीं महात्मा-गांधी हे सत्याग्रह करण्यास तयार झालें होते. महात्माजींना मदत करण्याकरितां गोखल्यांनीं फंड काढिला याचवेळीं पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमिलें जाऊन त्यांत गोपाळरावांची नेमणूक केली गेली. या कमिशनचा कामाचा बोजा त्यांचेवर फारच पडला. साक्षीदाराच्या साक्षी घ्याव्या लागत असे. युरोपियन सरकारी नोकर तर मोठ्या तोऱ्यानेंच साक्षीस येत असत. यावेळीं त्यांना काम फार करावें लागत असे. पांच सहा तास कायती झोंप मिळेल तेवढींच कायतें. बाकी विसांवा असा मुळीं नसे. त्यांची प्रकृती पहिल्यापासून मधूमेहानें बिघडली होती. त्यांत या श्रमाची भर पडल्यानें ती प्रकृति जास्तच बिघडली. हिंदुस्थानांत मोठ्या हुद्दयावर फक्त युरोपियन असावेत असा येथील नोकरांचा हट्ट होता. त्यांचें हें म्हणणें आधारासह खोडून काढण्याकरितां गोखल्यांना श्रम करावें लागत असत. यांतच आफ्रिकेंतील सत्याग्रहाचे मदतीकरितां फंड जमविण्यास त्यांना फिरावें लागे ते वेगळेच. १९१३ च्या फेब्रुवारींत ते लाहोरास गेले. तेथें फंडाकरितां त्यांनीं दोन दिवस फार श्रय करून २५ हजार रुपये जमविले, याच वेळीं त्यांना हृदयाचा विकार जडला व त्यांतच त्यांचा शेवटीं अंत झाला.

बाल मित्रांनो ! तुम्हांला दक्षिण आफ्रिकेंतल्या लढ्यासंबंधानें थोडीशी माहिती करून देणें भाग आहे. हा तंटा अद्यापपर्यंत सुरूच आहे व आणखी किती काल चालेल हें कांहीं आज सांगतां येत नाहीं. तेव्हां याची माहिती तुम्हांला असणें अगदीं जरूर आहे. दक्षिण आफ्रिकेंत जी वसाहत स्थापन झाली आहे तिचा ताबा तेथील सरकार पहात असतें. आफ्रिकेंत हिंदी लोक मजूर म्हणून गेले तर ते अगदीं थोड्या खर्चांत तेथें राहूं शकतात. शिवाय हिंदी लोक अंग मोडून काम करणारे कुशल असल्यानें पैसा मिळवतील म्हणून तेथील सरकाराचा हिंदी लोकांवर डोळा आहे. ब्रिटिश साम्राज्याखालीं दक्षिण आफ्रिका आहे तेव्हां तेथें राहणाऱ्या युरोपियन लोकांप्रमाणें आमचा हक्क आहे असें हिंदी लोकांचें म्हणणें आहे. परंतु युरोपियन लोक हिंदु लोकांस याबद्दल वाटेल तसे छळतात. हिंदुलोकांकरितां कांहीं वेगळ्या जागा केल्या आहेत. हिंदी लोकांना कसलाही मान नाहीं. यामुळें तेथील स्थिति पाहून महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांचें कोंवळें मन बिथरलें. हा अन्याय दूर करण्याकरितां त्यांनीं सत्याग्रहासारखी धाडसाची मोहिम सुरू केली. या कामीं कांहीं तडजोड करावी म्हणून गोखले तिकडे गेले होते. गोखल्यांचा मान वसाहत सरकारांनीं चांगला ठेविला. त्यांचा हा हेलपाटा अगदींच कांहीं व्यर्थ गेला नाहीं. थोडाबहूत उपयोग झाला. महात्मा गांधींची सत्याग्रहाची चळवळ जोरानें सुरू झाली तेव्हां तिच्या खर्चाकरितां गोखले यांनीं दरमहा दोन हजार पौंड म्हणजे तीस हजार रुपये पुरविण्याचें वचन दिलें होतें. पहिल्या महिन्यास इतका फंड जमला नाहीं यामुळें केवळ वचनाकरितां म्हणून गोखल्यांनीं पदरच्या पैशांनीं हा आंकडा पुरा केला. आपण बोलूं तें खरें करून दाखविण्यास इतके ते झटत असत ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. याप्रमाणें गोखले यांनीं या फंडाकरितां पांच लक्ष रुपये जमवून ते सत्याग्रहास दिले आहेत, एवढ्यावरच ते थांबले नाहींत

त्यांनीं आपलें वजन खर्ची घालून हिंदुस्थान सरकारची शक्य ती मदत मिळविण्याची खटपट केली आहे. परंतु ती माहिती फारशी बाहेर पडली नाहीं.

हिंदुस्थान देशाची सर्व सत्ता येथें नेमिलेल्या नोकरांचे हातीं असल्यानें यास ' नोकरशाही ' असेंही नांव देतात. हे लोक बहुधा सिव्हिल सर्व्हिस मधले असतात. यामुळें त्यांची एक जातच बनली आहे. हिंदी लोकांस स्वराज्याचे हक्क दिल्यास यांच्या पोटास चिमटा बसणार. यामुळें हे लोक अगोदर पासूनच ओरड करावयास सुरवात करित असतात. परंतु इंग्लंड, मधले सर्वच लोक तसे आहेत असें मात्र नाहीं. हिंदुस्थानांतील नोकर-लोकांचें अत्याचार या लोकांना कळले तर त्यांना वाईट वाटतें. असे उदार लोक तिकडे आहेत. परंतु या लोकांना खरी माहितीच मिळत नाहीं. वर्तमान पत्रावरून काय माहिती मिळेल तेवढीच. परंतु यावरही नोकरशाही आपला मुलामा करण्यास कमी करीत नाहीं. गोखल्यांनीं इंग्लंडास इतक्या खेपा केल्या त्या कांहीं व्यर्थ गेल्या नाहींत. त्यांना पाहिजे होतें तसें यश मिळालें नाहीं ही गोष्ट वेगळी. परंतु हिंदु-स्थानची करुणकहाणी त्यांनीं मोठ्या जबाबदारीनें लोकांपुढें मांडिली-हिंदुस्थानाविषयीं इंग्लंडमध्यें लोकांना फारशी माहिती नाहीं. ही माहिती लोकांस करून देण्याकरितां तेथें एक ब्रिटिश कांग्रेस कमिटी स्थापन केली होती व त्या संस्थेमार्फत इंडिया वर्तमान पत्र निघत होतें. या पत्रांत हिंदुस्थानची माहिती देत असून ते पत्र पार्लमेंटच्या सभासदा-कडे पाठवून देण्याची वहिवाट परवांपर्यंत होती. हें काम म्हणजे फार जबाबदारीचें व खर्चाचें होतें. या पत्रास वर्गणीदार जमणें कठीण पडते. गोखले यानीं सतत दहा वर्षें खटपट करून तें पत्र चालविलें होतें.

स्वराज्य संपादन करण्याकरितां आतांपर्यंत जे प्रयत्न सुरू आहेत व त्यांपैकीं कांहींसें स्वराज्य मिळालें आहे याला सर्वस्वी कोण कारणीभुत आहे ह्याचबद्दल वादविवाद असूं शकेल. परंतु गोपाळराव गोखले यांची

कामगिरी याला काहींच उपयोगी पडली नाहीं असें कांहीं कोणास प्रामाणिकपणें वाटणार नाहीं खास. याचें सगळें श्रेय गोखल्यांना देऊं नका परंतु त्यांतला कांहीं तरी भाग त्यांच्या वांट्यास आल्याशिवाय खास रहात नाहीं. गोखलें हे प्रथम एका प्रांतांचे पुढारी झाले पण पुढें त्यांनी बुद्धीमत्ता व योग्यता लोकांस कळून आल्यानें त्यांना लोकांनीं देशाचा पुढारी केला. परंतु एवढ्यानें भागलें नाहीं. आफ्रिकेच्या प्रवासांत तें 'ब्रिटिश साम्राज्यांतील पुढारी' बनले होते. केवढा तरी हा उत्कर्ष !

गोपाळराव गोखले यांनीं कायदे-कौन्सिलमध्यें फारच उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आपल्याला पुष्कळ असावें असें वाटतें परंतु समंजसपणें तें कसें मिळवावें हें मात्र नीटसें कळत नाहीं. हीच मोठी जबाबदारी असते. जितकें काम करितां येईल तितकें करण्यास त्यांनीं कांहीं हयगय केली नाहीं. गोखले जेव्हा कौन्सिलमध्यें गेले त्यावेळीं हिंदुस्थान सरकारचा कारभार कर्जबाजारीपणाचा नव्हता. दरसाल पांच कोटींची शिल्लक रहात होती. तेव्हां लोकांवरील कराचा बोजा कमी करावा म्हणून गोपाळरावांनीं प्रयत्न केला. प्राप्तीवर कर व मिठावरील कर कमी करण्याची त्यांनीं शिफारस केली. १९०३ सालीं मिठावरील कर दरमणी २॥ रुपये होता तो २ रुपये केला. हिंदी लोकांना मोठ्या हुद्याच्या जागा देण्याबद्दल जोरानें प्रयत्न केला. १९०५ सालीं मिठावरील कर पुन्हां दरमणीं ॥ कमी केला. प्राथमिक शिक्षणास खर्च जास्त करावा, शेतकी सुधारणा करावी, धंदेशिक्षण द्यावें, आरोग्यास मदत करावी इत्यादि गोष्टी त्यांनीं सरकारास सुचविल्या. १९०७ सालीं मिठावरील कर दरमणीं १ रुपाया केला. नाताळांत इकडून मजूर पाठवीत त्यांना मुदतबंदी मजूर असें म्हणतात. ही पद्धत गोखले यांनीं १९१० सालीं बील आणून बंद करविली. १९११ सालीं वाढत्या

खर्चास शाळा घालण्यास सुचविलें व प्राथमिक सक्तीचें मोफत शिक्षण करण्याचे बील पुढें आणिलें. १९१२ सालीं या बिलाचें दुसरें वाचन होऊन तें मंजूरही झालें.

लोकांची बाजू सरळपणें पुढें मांडून जितकें लोककल्याण करितां येईल तेवढें करण्यास गोखले यानीं मुळींच कमी केलें नाहीं. सरकारनें दडपशाही करणारे कायदे करण्याकरितां जेव्हां बिलें कौन्सिल पुढें आणिलीं तेव्हां त्याबद्दल कानउघडणी करण्यास त्यांनीं मुळींच कमी केलें नाहीं. लोकांची बाजू सोडून ते कधीं सरकारचे बाजूचे झाले नाहींत. मात्र कोणतीही गोष्ट अति होऊन फाटूं देत नसत. सरकार व प्रजा या दोघांना खुष ठेवून होईल तेवढें काम गोखल्यांनीं केलें. तें सहकारितां करणारे होते. दुसऱ्याचे म्हणण्याप्रमाणें गोखले यांचे हातून यापेक्षां जास्त कामगिरी झाली असती. परंतु सरकार व प्रजा या दोहोंना न दुखवितां काम करण्याची त्यांची हातोटी उत्कृष्ट होती. एवढें खरें आहे.

अशा तऱ्हेनें कामगिरी करीत असतां त्यांचा सर्वकाळ लोकोपयोगी कामें करण्यांत गेला. शेवटीं या श्रमाचा त्यांचे प्रकृतीवर परिणाम झाला. अखेर तारीख १९ फेब्रुवारी १९१५ रोजीं गोखल्यांनीं इहलोकची यात्रा संपविली. मरणापूर्वी तीन दिवस अगोदर ते देशासंबंधानें विचार करीत होते.

गोखल्यांच्या मृत्युनें देशांतील एक पुढारी नाहींसा झाला. याबद्दल फक्त हिंदु लोकांसच नव्हे तर कित्येक युरोपीयन लोकांसही वाईट वाटलें जिकडे तिकडे शोक प्रदर्शनाच्या सभा भरल्या. दुःखवट्याचे ठराव पास झाले आहेत. यावरून त्यांची योग्यता सहज कळून येणारी आहे.

---

# पाठ ८ वा.

—:*:—

# गोखल्यांचें गुण.

बाल वाचकांनो ! आतांपर्यंत तुम्हीं चरित्र वाचलेत आतां आपण त्यापासून काय शिकावें हें पाहण्याकरितां आपल्याला कै० नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या गुणांकडे पाहिले पाहिजे. ते थोर पुरुष होऊन गेले असल्यानें त्यांचे गुणही तसेंच थोर होते. आपल्याला तेवढेंच तुर्त पहावयाचें आहे. त्यांनीं असें न करितां तसें केलें असतें तर कसें झालें असतें अशा तऱ्हेनें केवळ कल्पनेचा खेळ खेळत बसण्याची आपली वेळ नव्हे. त्यांचें अंगीं जे लोकोत्तर गुण होते ते गुण घेणें हेंच आपलें आतांचें कर्तव्य आहे. तें कर्तव्य आपण प्रथम करूं या. नंतर मग योग्य-वेळीं याची चौकशी करा.

गोखल्यांच्या अंगीं अनेक लोकोत्तर गुण होते. त्यापैकीं कांहीं प्रमुख गुण येथें दाखल करणार आहे. बालमित्रांनो ! हे तुम्ही नीट लक्षपूर्वक वाचून त्याप्रमाणें वागण्याचे ठरवा.

त्यांचा " पहिला गुण " म्हणजे देशाच्या स्थितीचें व राजनीति शास्त्राचें ज्ञान हें होय. राजनीति शास्त्र हें एक शास्त्रच आहे. याचें शिक्षण पद्धतशीरपणेंच झालें पाहिजे. त्याशिवाय उगीच सरकार चांगलें नाहीं असें म्हणणें शहाणपणाचें होणार नाहीं. सरकारची चूक कोठें व कशी होते हें सप्रमाण, सरळपणें दाखविणें हें मुख्य कर्तव्य असतें. सर्व राज्य-कारभाराची माहिती असल्याशिवाय चांगलें वाईट म्हणणें चुकीचें ठरतें. गोखले यांनीं या शास्त्राचा नीट अभ्यास केला असल्यानें त्यांनीं वेळोवेळीं सरकारावर टीका केल्या व अनेक सुधारणा करून घेतल्या. याचें कारण त्या

शास्त्राचा नीट अभ्यास हाच होय. न्या. रानडे यांचे जवळ गोखले यांनीं हें शिक्षण सुमारें बारा वर्षें घेतलें. याची परीक्षा वेल्बी कमिशन पुढल्या साक्षींत झाली. त्यांत गोखले चांगल्या प्रकारें पास झाले. यानंतर ते प्रत्येक बाबतींमध्यें जबाबदारीनें टीका करीत. यामुळें गोखल्यांचे विरुद्ध बोलतांना सरकारी नोकरांनासुद्धां विचारच करावा लागत असे.

व्यवस्थित मांडणी हा दुसरा गुण होय. विषय कितीहि कठीण असो परंतु तो व्यवस्थेशीरपणें पुढें मांडून सोपा करण्याची हातोटी गोखल्यांना चांगली साधली होती. कौन्सिलमध्यें या गुणाची अत्यंत जरूरी असते. आपण काय म्हणतो, का म्हणतो हे सर्व सभासदांना नीट पटवून दिलें तरच त्यांची मतें आपल्याला पडतील हे जाणून होतें. या गुणाबद्दल सर जेम्स मेस्टन यांनीं मुक्तकंठानीं स्तुती केली आहे.

त्यांचा तिसरा गुण इंग्लिश भाषेवरील प्रभुत्व होय. एखादी भाषा बोलतां येणे यांत कांहीं विशेष नाहीं परंतु आपले विचार त्या भाषेंत सुंदर तऱ्हेनें मांडणें हें काम मात्र फारच अवघड आहे. शास्त्रशुद्ध दृष्टीनें ती भाषा बोलण्याकरितां त्या भाषेचा चांगला अभ्यासच केला पाहिजे गोखले यांनीं इंग्लिश भाषेचा फार अभ्यास केला होता. कित्येक उत्तम व्याख्यानें त्यांनीं तोंडपाठ करून टाकिलीं होतीं. योग्य ठिकाण योग्य शब्द वापरण्याची त्यांना हातोटी साधून गेली होती. इंग्लंडमध्यें-सुद्धां त्यांच्या भाषाशैलीची वाहवा झाली होती.

चौथा गुण नियमितपणा हा होय. ठरल्यावेळीं सर्व कामें करावयाचीच. या गुणाची फार जरूरी असतें. एखाद्यास अमुक वेळांत भेटतों म्हणून सांगितलें तर त्यावेळीं गेलेच पाहिजे. ही संवय सर्वांनीं करावी. उगीच वाटेल तेव्हां कामें करणें नाहींतर अगदीं स्वस्थ बसणें. सर्व दिवस आळसांत घालविणें हें अत्यंत वाईट होय. हें सर्व संवयीवर अवलंबून

असतें. जशी संवय करावी तशी होत असते. नियमितपणें वागण्याची संवय लहानपणापासून लावून घ्यावी हें चांगलें.

स्वाभिमान हा पांचवा गुण होय. गोखले हे मवाळ, नेमस्त असे जरी लोक म्हणतात तरी स्वाभिमानी होते. त्यांनीं अपमान कधींहि सहन केला नाहीं. कौन्सिलमध्यें हिंदी लोकांना फारसा मान नव्हता. एखादा युरोपियन सभासद वाटेल तसे बोलत असत असा प्रसंग गोखल्यावर आल्याबरोबर त्यांनीं तात्काळ तेथेंच त्याची कानउघडणी केली. यामुळें पुढें अशा तऱ्हेनें पुढें ते लोक भिचकूं लागले.

सहावा गुण म्हणजे ते कधीं व्यक्तिशः टीका करीत नसत. सामाजिक राजकीय वादांत खासगी कुसपटें काढून एकमेकांवर तुटून पडण्याचा प्रघात आपल्याकडे आहे. वाद असला तर तत्त्वापुरता असावा. बाकीच्या गोष्टींबद्दल विरुद्ध जाण्याचें कारण नाहीं. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

जबाबदारीची जाणीव हा त्यांचा सातवा गुण होय. जबाबदारीची जाणीव हे शब्द दिसावयास थोडे दिसतात खरें परंतु त्या शब्दाचें महत्त्व किती असतें याचा विचार करून पहावा म्हणजे कळून येतें. आपल्यावर सर्व देशाच्या कल्याणाची जबाबदारी आहे हें जाणून सारासार विचार करून ते केव्हांहि वागत असत. पुढारी म्हटला कीं, त्याचेवर सर्व प्रकारची जबाबदारी येऊन पडते. मी वाटेल तसा वागेन असें म्हणून केव्हांहि चालत नाहीं. लोकांचें दुःख तेंच आपलें दुःख समजून तें दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ना. गोखले यांना ही जाणीव तीव्र होती याबद्दल शंकाच नाहीं.

राजकीय चळवळीमध्यें पक्षभेद, मतभेद हे असावयाचेच. जो तो आपल्याला मताप्रमाणें देशाची उन्नती करावयास झटत असतो. प्रत्येक पक्ष आपापल्या पक्षास लोकमत जास्त मिळविण्याची खटपट करीत

असतो. यामुळें त्या त्या पक्षामध्यें वांकडे पडत असते. हा प्रकार आपल्याच देशांत आहे असें नाहीं. पृथ्वीवरील सर्व देशामध्यें हा झगडा ऐकूं येत असतो.

आतां आपण गोखले यांनीं स्थापन केलेल्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी या संस्थेकडे वळूं. गोखले यांच्या कामगिरीची ही संस्था साक्ष देत आहे. आपला देश हाच देव मानून त्याकरितां झटणारे लोक तयार करणें हें या संस्थेचें काम आहे. पूर्वींच्या पुराणांत ऋषींचे आश्रम असत तशाच प्रकारची ही संस्था आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. पूर्वींचे ऋषी संसार, व्यक्तिस्वार्थ यावर पाणी सोडून केवळ अध्यात्मिक ज्ञानाकरितां झटत, त्याचप्रमाणें या संस्थेच्या सभासदानें आपला व्यक्ति-स्वार्थ सोडून देशाची उन्नती करण्यासरितां झटले पाहिजे. या सोसायटी. मार्फत पुढील कामें करावीत असें ठरलें आहे. ( १ ) दुःख निवारण. ( २ ) समाजसेवा. ( ३ ) सहकारी-तत्वाचा प्रसार. (४) समाज शिक्षण. ( ५ ) राजकीय चळवळ.

सदरें पांचच असलीं तरी कार्य फार मोठें आहे. या सोसायटीचा प्रत्येक सभासद पदवीधर असला पाहिजे. व तो स्वार्थत्याग करावयास तयार असला पाहिजे. असा नियम आहे. समाजसेवा कशीं करावी याचें शिक्षण या सोसायटींत दिलें जातें. या सोसायटीचे हे नियम अत्यंत कडक असल्यानें त्याचे सभासद फार दिसत नाहींत पण जे आहेत त्यांचा सर्व जन्म देशसेवेंत जाणार असल्यानें त्यांची योग्यता फार आहे. शंभर इसमांनीं केवळ देशाच्या गप्पा शिळोप्याचे वेळीं मारण्यापेक्षां एकच समाजसेवा करणारा इसम पुरे आहे. प्रत्यक्ष काम करणाराची जरूरी असते. वाचाळता चोहींकडे आहेत. म्हणून श्रीसमर्थ म्हणतात कीं—

**क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।**

ना. गोखले यांना जो मान मिळतो आहे त्यांतलें मुख्य सार हेंच

आहे. त्यांनीं केवळ शब्दाची वाचाळता न करितां होईल तेवढें प्रत्यक्ष देशकार्य करून दाखविलें. म्हणूनच त्यांचें नांव अजरामर राहिलें आहे.

मरावें परी कीर्तीरूपें उरावें ।

हें श्रीसमर्थांचें म्हणणें त्यांनीं खरें करून दाखविलें आहे.

बाल सवंगड्यानो ! तुम्हाला ना. गोखले होतां येईल. तुम्ही प्रथम आपलें कर्तव्य म्हणजे अभ्यास पुरा करा. ना. गोखले यांचे गुण पूर्ण-अंगीं पूर्णपणें उतरवून घ्या. स्वस्थपणें सारासार विचार करा व मग पाहिजे तें करा.

इतकें तुम्ही केलेंत तरी पुरें आहे, मग जास्त बोजा कशाला देऊं ? तेव्हां दुसऱ्या चरित्राकडे वळण्यास हरकत नाहीं.

REFBK-0002481

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
बा. क्र. २४८९
मुंबई शाखा

# प्रस्तावना.

काल्पनिक गोष्टी कितीही चटकदार व बोधप्रद असल्या तरी खऱ्याखुऱ्या घडलेल्या गोष्टींची किंमत त्यांहून निःसंशय अधिक आहे, हें कोणीही कबूल करील. थोरांचीं चरित्रें ऐकून त्यांचें बालपण कसें काय गेलें असेल, अशी जिज्ञासा साहजिकच मनांत उत्पन्न होते. या करितां निरनिराळ्या काळींच्या व स्थळींच्या थोर स्त्रीपुरुषांच्या बालपणांतील मनोरंजक व बोधप्रद गोष्टी एकत्र गुंफून हें '**थोरांचें बालपण**' माझ्या बालमित्रांच्या हातीं देत आहें. माझा हा प्रयत्न त्यांना पसंत पडल्यास या पुस्तकाचे पुढील भागही सवडी सवडीनें **बालसन्मित्रमालेंतून** प्रसिद्ध करीन.

बालसन्मित्र-कार्यालय,
मालवण १।५।६।२६.

**पा. ना. मिसाळ.**

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| थोरांचें बालपण काय शिकवील ? | १ |
| १ गौतमबुद्ध ... ... | ३ |
| २ श्री शिवाजी महाराज | ६ |
| ३ शिकंदर बादशाहा ... | १२ |
| ४ महादेव गोविंद रानडे | १४ |
| ५ महाराणी व्हिक्टोरिआ | १५ |
| ६ मोहनदास करमचंद गांधी | १६ |
| ७ नेल्सन ... ... | २० |
| ८ स्वामी विवेकानंद ... | २१ |
| ९ जेम्स गार्फील्ड .. | २२ |
| १० गोपाळ कृष्ण गोखले | २४ |
| ११ प्रिन्स बिस्मार्क ... | २५ |
| १२ आल्फ्रेड दि ग्रेट ... | २७ |
| १३ हरी नारायण आपटे ... | २८ |
| १४ जोसेफ मॅझिनी ... | ३० |
| १५ राजा राममोहन राय .... | ३१ |
| १६ जॉर्ज वॉशिंग्टन ... | ३३ |
| १७ श्रीधर गणेश जिन्सीवाले | ३५ |
| १८ शेखसादी ... .. | ३८ |
| १९ रामचंद्र विठोबा धामणस्कर | ४० |
| २० बेंजामिन फ्रांक्लिन ... | ४२ |
| २१ देवी अहिल्याबाई होळकर | ४५ |
| २२ रामकृष्ण गोपाळ भांडारकर | ४७ |

# थोरांचें बालपण.

३०५१२

## थोरांचें बालपण काय शिकवील ?

बालमित्रांनो, आज तुमचें बालपण आहे. पण हें बालपण असेंच कायम राहावयाचें नाहीं. तुम्ही आज लहान आहां ते हळुहळु मोठे व्हाल. आज जीं जगांत मोठीं माणसें तुमच्या नजरेसमोर दिसत आहेत किंवा पूर्वीं जीं मोठीं माणसें होऊन गेलीं, तीं सर्व तुमच्या सारखींच लहान होतीं. राजा असो, विद्वान् असो, अविद्वान् असो, कोणीही असला, तरी त्याला बालपण हें असतेंच. तीं माणसें एकदमच कांहीं मोठीं झालेलीं नसतात.

ज्या प्रमाणें आजचीं मोठीं माणसें हीं पूर्वीं बाल्यावस्थेंत होतीं, त्या प्रमाणेंच तुम्हीही आज जरी बाल्यावस्थेंत आहां तरी नेहमीं तुमची बाल्यावस्था राहाणार नाहीं. आजचे ' बाल ' हेच पुढें ' थोर ' व्हावयाचे आहेत. तुम्ही कोणतीही खटपट केल्यावांचून प्रत्येक दिवशीं थोडथोडे वाढत आहां. वयोमानाप्रमाणें प्रत्येक मनुष्य बालपणांतून तारुण्यांत व तारुण्यांतून वृद्धावस्थेंत जात असतो. त्याप्रमाणें तुम्हीही हळुहळु या स्थितींत जाल.

मनुष्याचें वय आपोआप वाढत असतें. त्याला निराळी खटपट करावी लागत नाहीं. परंतु थोरपणा हा केवळ वयावर अवलंबून नसतो वयानें थोर तो खरा थोर नव्हे. योग्यतेनें थोर, तोच खरा